Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २७२ * * नागपूर * सोमवार, दिनांक ३० डिसेंबर २०२४ ८ पाने ● किंमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## रायगड जिल्ह्यात सात वर्षांच्या मुलीवर अत्याचार

रायगड, दि. २९ प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील एका गावात बावीस वर्षीय नराधमाकडून सात वर्षीय मुलीवर अत्याचार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आलाय. आरोपी हा फरार झाला असून पोलिस निरीक्षक नामदेव बंडगर यांच्या मार्गदर्शनाखाली चार ते पाच पथक नेमले असून त्याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिस विभागाकडून मिळाली आहे. मात्र, या घटनेने लोकांना मोठा धक्का बसलाय. आरोपीला तात्काळ अटक करण्याची मागणी आता केली जात आहेत.

संपादकीय

## खरीखरी

### प्राजक्ताचे कोमेजणे

चित्रपट सृष्टीतील अत्यंत संवेदनशील अभिनेत्री प्राजक्ता माळी यांना काल नको ते स्पष्टीकरण देण्यासाठी पत्रकार परिषद घ्यावी लागली. हे केवळ एकमेव प्राजक्ता माळी यांचे दुर्दैव नाही. तर आपल्या राजकारणाचे आणि पत्रकारितेचेही दुर्दैवी आहे. राजकारणी आजकाल बोलताना संयम पाळत नाहीत. सुरेश धस या आमदाराने आपल्या बाईटमध्ये जी काही धसकटे कापली. त्यामुळे प्राजक्ता माळी यांचे व्यथित होणे स्वाभाविक होते. सुरेश धस यांनी जे दिवे लावले. ते अत्यंत हीन आणि खालच्या पातळीवरील बेरकी दर्जाचे होते. त्या दिव्याचे तेल अत्यंत घाणेरडे होते आणि सुरेश धस यांची मानसिकता तर अत्यंत हीन दर्जाची होती. हे सांगायला आम्हाला जराही वाईट वाटत नाही. स्त्री ही कुठलीही असो. तिच्या अब्रूची लक्तरे अशा भाषेत टांगणे. हे कोणाही महिलेला अत्यंत क्लेशदायक असते. सुरेश धस ज्या पद्धतीने महिलांच्या बाबतीत बोलले. तसेच पुरुषांच्या बाबतीत का नाही बोलले? हा आमचा प्रश्न आहे. पुरुषांची अब्रू अब्रू असते आणि स्त्रीची अब्रू अब्रू नसते काय. या गोष्टीची धस यांना जर जाणीव असती. तर सुरेश धस यांनी सत्ताधारी पक्षाचा एक जबाबदार आमदार असताना असले सडकछाप वक्तव्य अजिबात केले नसते. आमदार धस यांनी उडताउडता जी काही मुक्ताफळे उधळली आहेत. त्यामुळे आमचे उथळ यु-ट्युब वाले आणि भाषा भिकारडे पत्रकार जणू काही त्यांना वाट्टेल ते लिहायला परवानाच मिळाला आहे. अशा आवेशात तुटून पडलेले आहेत. कलावंतांना कलावंत म्हणून जी भूमिका पार पाडावी लागते. त्या भूमिकेचा आणि त्यांच्या एकूण वर्तनाचा वाटेल तसा अर्थ काढणे. हे अत्यंत चुकीचे आहे. विशेषता या प्रकरणात संबंधित अभिनेत्रीवर तो घोर अन्याय करण्यासारखे नाही काय. प्राजक्ता माळी यांच्याबरोबर त्यांची आई होती, त्यांचा भाऊ होता. त्या सर्वांच्या चेहऱ्यावर असलेली उदासी अगदी स्पष्टपणे दिसत होती. आपली आई हे वक्तव्य ऐकल्यापासून झोपलेली नाही, असे प्राजक्ताने सांगितले. आपल्या प्रतिभावान आणि यशस्वी मुलीच्या बाबतीत एका आईने हळवे होणे अत्यंत स्वाभाविक आहे. महिलेची अब्रू काचेसारखी असते. एकदा तडा गेला तर काय होईल, हे सांगता येत नाही. सुरेश धस यांनी आपल्या विधानाबद्दल माझी माफी मागावी. अशी साधी विनंती काल पत्रकार परिषदेत प्राजक्ता माळी यांनी केली होती. त्यावर सुरेश धस यांनी निर्लज्जपणे आपण माफी मागणार नाही. असे म्हणणे म्हणजे हा हलकटपणाचा कळस आहे. अहो तुम्ही आमदार आहात. खूप दमदार आहात, म्हणजे तुम्हाला वाटेल तसे बोलण्याचा परवाना मिळालेला नाही. प्राजक्ता माळी यांची आतापर्यंतची कारकीर्द अतिशय यशस्वी आहे. प्राजक्ताच्या वागण्यातील अदब तसेच अनेक नामवंत कलावंतांसोबत फिल्मी दुनियेत राहूनही आपली वेगळी ओळख निर्माण करण्याचे त्यांचे कौशल्य आणि कसब सर्वांनाच ठाऊक आहे. कलावंतांना अनेकदा अनेक ठिकाणी जावे लागते. अनेक कार्यक्रम करावे लागतात. अशा एखाद्या कार्यक्रमात कोणी सत्कार केला आणि त्याचे फोटो काढल्यावर, त्यातून भलत्याच मानसिकतेने भलतेसलते अर्थ शोधून काढणे आणि त्यावरून चारित्र्यहनन करणे. हा प्राजक्ता म्हणतात त्याप्रमाणे गुन्हाच आहे. आपण मुख्यमंत्र्यांना भेटून याबाबतीत तक्रार करणार आहोत, हे प्राजक्ताचे म्हणणे अतिशय योग्यच आहे. राज्याच्या प्रथम नागरिकाला आपली व्यथा आपण सांगितलीच पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याबाबतीत अत्यंत संवेदनशील आहेत. ते या धसांची धसकटे कशी वाईट आहेत. त्यासोबतच अत्यंत अनुपयुक्त आणि अवेळी उच्चारलेली आहेत. हे बघून धस यांना जोरदार तंबी देतील. यात दुमत नाही. अकारण प्राजक्ताच्या झालेल्या बदनामीबद्दल गंभीरपणे माफी मागण्याचाही सल्ला देतील. अशी अपेक्षा करायला काही हरकत नाही. प्राजक्ता माळी अत्यंत प्रांजळपणे कोणाचीही भीडभाड न बाळगता आपल्या बावन्नकशी बुद्धीच्या जोरावर ज्या हिमतीने पत्रकारांच्या समोर आल्या आणि आपली बाजू मांडून आपल्याला काय क्लेश झाले आहेत ते सांगितले. त्याबद्दल प्राजक्ता निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत. भविष्यात त्यांना मोठे यश लाभो आणि या बदनामीच्या जंजाळातून त्यांची मुक्तता होवो, ही आमची शुभेच्छा आहे !

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# द.कोरियात विमानाचा भीषण अपघात




सेउल, दि. २९ वृत्तसंस्था

दक्षिण कोरियातील मुआन विमानतळावर मोठी दुर्घटना घडली आहे. बँकॉकमधून प्रवाशांना घेऊन आलेले विमान लँडिंग होताना अपघात झाला. यावेळी विमानाला लागलेल्या भीषण आगीत 179 प्रवाशांचा मृत्यू झाला.

धावपट्टीवरून जाऊन विमान भिंतीवर आदळल्यानंतर विमानानं पेट घेतला. दोन प्रवासी वगळता सर्व जण म्हणजे 179 प्रवासी ठार झाल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितले. हा अपघात स्थानिक वेळेनुसार सकाळी 9:07 वाजता घडला. अपघातात दोन महिला बाचल्या आहेत. त्यामध्ये एक प्रवासी आणि एक क्रू मेंबर आहे. त्यांच्यावर मोक्पो येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**अपघाताचे नेमके कारण काय?**

बँकॉकहून परतणाऱ्या विमानात सहा क्रू मेंबर्ससह एकूण 181 प्रवासी होते. दोन थायलंडचे नागरिक वगळता बहुतांश प्रवासी कोरियन नागरिक होते.स्थानिक टीव्ही स्थानकांद्वारे प्रसारित केलेल्या व्हिडिओमध्ये विमान लँडिंग गियरवर उतरताना जमिनीवर घसरल्याचे दिसते. स्फोट होण्यापूर्वी विमान काँक्रीटच्या भिंतीवर आदळले. त्यानंतर भीषण आगीत संपूर्णपणे भस्मसात झाले. लँडिंग गियरमध्ये बिघाड आणि शक्यतो पक्ष्यांच्या धडकेमुळे हा विमान अपघात झाला असावा. नेमके कारण शोधण्यासाठी घटनास्थळी चौकशी सुरू आहे.दक्षिण कोरियाच्या आपत्कालीन कार्यालयाच्या माहितीनुसार विमानतळावरील आग विझवण्यात आली. दक्षिण कोरियाच्या मुआन शहरातील विमानतळावरील जेजू एअर पॅसेंजर विमानाला लँडिंग होताना अचानक आग लागली. या दुर्घटनेतील काही प्रवाशांना बाहेर काढण्यात आलं आहे. हे विमान सुमारे 181 लोकांसह बँकॉकहून परतत होते. दक्षिण कोरियाच्या आपत्कालीन कार्यालय आणि स्थानिक माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, लँडिंग गियरमध्ये बिघाड असल्यानं विमान धावपट्टीवरून घसरून कुंपणाला धडकले. त्यामुळे विमानतळावर रविवारी विमानाला आग लागली. स्थानिक टीव्ही माध्यमांनी विमान दुर्घटनेचे व्हिडिओ प्रसारित केले आहे. यात विमान लँडिंग होताना विमानाला भीषण आग लागल्याचं दिसून आले.

# नवी मुंबई विमानतळावर पहिल्या विमानाचे यशस्वी लँडिंग



नवी मुंबई, दि. २९ प्रतिनिधी

मुंबई छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील भार कमी करण्यासाठी नवी मुंबईत उभारण्यात आलेलं विमानतळ लवकर सुरू होणार आहे. आज 29 डिसेंबर रोजी दुपारी दीडच्या सुमारास पहिलं व्यावसायिक विमान इंडिगो A-320 चं यशस्वी लँडिंग करण्यात आलं. महिनाभरापूर्वी या विमानतळावर केलेलं लँडिंग यशस्वी झाल्यानंतर पहिल्यांदाच व्यावसायिक विमानाचं लँडिंग करण्यात आलं आहे. यशस्वी लँडिंग झाल्यानंतर विमानाला पाण्याची सलामी देण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, मार्च 2025 पासून नवी मुंबई विमानतळ कार्यान्वित होणार असू एका वर्षाला 9 कोटींहून अधिक प्रवासी प्रवास करू शकतील. सुमारे 5945 एकर जागेवर हे विमानतळ उभारण्यात आलं असून हैद्राबाद येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळानंतर नवीन मुंबईतील विमानतळ हे दुसरे देशातील सर्वात मोठं विमानतळ आहे.

या विमानतळाचा रनवे 3.7 किमी इतका असून या विमानतळावर एकाचवेळी 350 विमाने उभी राहू शकतात. येथे देशातील सर्वात मोठी कार्गो प्रणाली तयार करण्यात आली आहे. सिडको आणि जीव्हीके (GVK) यांनी एकत्र येत हे विमानतळ बांधले आहे. मुंबईपासून 40 किमी अंतरावर असणाऱ्या पनवेलजवळ हे विमानतळ बांधण्यात आले आहेत.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील जवळपास सर्व कामे पूर्ण झाली आहे. रन वे, सिग्नल यंत्रणा ही सर्व महत्त्वाची कामं पूर्ण झाली आहेत. महिन्याभरापूर्वी लँडिंग चाचणी यशस्वी झाल्यानंतर आता व्यावसायिक विमानाचं लँडिंग होणार आहे. यावेळी सिडको आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड कंपनीचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. सुरुवातीला या विमानतळावरून वर्षाला नऊ लाख प्रवासी प्रवास करू शकतील, तर 100 टक्के काम झाल्यानंतर 60 लाखांच्या आसपास प्रवासी वर्षाला प्रवास करतील.

# अजित पवार 20 हजार मतांनी पराभूत, महायुतीला फक्त 107 जागा

## आमदार उत्तम जानकर यांचा खळबळजनक दावा

बारामती, दि. २९ प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे माळशिरस विधानसभा मतदारसंघाचे आमदार उत्तम जानकर हे सातत्याने ईव्हीएमवर शंका घेत आहेत. त्यांच्या मतदारसंघात येणाऱ्या मारकडवाडी या गावात बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याची त्यांनी तयारी सुरू केली होती. मात्र पोलिसांनी हस्तक्षेप केल्यामुळे हे मतदान टळले. त्यानंतरही जानकर यांनी राजीनामा देण्याची तयारी दर्शविली. निवडणूक आयोग बॅलेट पेपरवर निवडणूक घेणार असेल तर आपण राजीनामा देण्यास तयार असल्याचे ते म्हणाले होते. आता त्यांनी अजित पवार यांच्या विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. तसेच ईव्हीएमचा अभ्यास केला असून महायुतीला राज्यात बहुमत मिळालेले नाही, असेही त्यांनी सांगितले. यावेळी महायुतीमधील तीनही पक्षांना किती जागा मिळाल्या याचे गणितच त्यांनी मांडले.

आमदार उत्तम जानकर यांनी आज बारामतीमध्ये शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.



ईव्हीएममध्ये गडबड होत असून याची प्रक्रिया राहुल गांधी, शरद पवार आणि निवडणूक आयोग यांच्या लक्षात आणून देणार असल्याचे ते म्हणाले. ईव्हीएमच्या कंट्रोल बॉक्समध्ये गडबड होत आहे. व्हीव्हीपॅटमधून जी पावती बाहेर येते, ती मतदारांच्या हातात दिली जावी आणि मतदार स्वतःच्या हाताने ती बॉक्समध्ये टाकले, अशी परवानगी देण्याची मागणी जानकर यांनी केली.

उत्तम जानकर पुढे म्हणाले, नुकत्याच झालेल्या निवडणुकीत जवळपास १५० मतदारसंघात गडबड झालेली आहे. याची सखोल चौकशी केल्यास अजित पवारही २० हजार मतांनी पराभूत असल्याचे दिसून येते. अजित पवार यांना एक लाख ८० हजार मते मिळालेली आहेत. त्यापैकी दोनास एक असे सूत्र वापरले गेले आहे. त्यामुळे युगेंद्र पवार यांना ८० हजार अधिक ६० अशी एक लाख ४० हजार मते मिळालेली असून अजित पवारांना केवळ १ लाख २० हजार मते उरतात.

यापुढे जाऊन उत्तम जानकर म्हणाले की, अजित पवार गटाचे केवळ १२ आमदार निवडून आलेले आहेत. एकनाथ शिंदे यांचे केवळ १८ आमदार निवडून आलेले आहेत. तर भाजपाचे केवळ ७७ आमदार निवडून आलेले आहेत. महायुतीची एकूण संख्या १०७ एवढी होते, दोन-तीन अपक्ष मिळून ते ११० पर्यंतच पोहोचतात. याबाबत मी सर्व मतदारासंघाचा बारकाईने अभ्यास केला असल्याचेही ते म्हणाले.

# भाषण संपल्यानंतरच व्हॉट्सअॅप चॅटचा स्क्रीनशॉट कसा आला?

## जितेंद्र आव्हाड यांचा सवाल

मुंबई, दि. २९ प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली. तसेच सर्वच स्थरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणातील काही आरोपींना अटक करण्यात आली. मात्र, काही आरोपी अद्यापही फरार आहेत. त्यामुळे संतोष देशमुखांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येत बीडमध्ये शनिवारी मोर्चा काढला. या मोर्चात बोलताना अनेक लोकप्रतिनिधींनी वाल्मिक कराड मागचा सूत्रधार असल्याचा आरोप विरोधकांनी केला.



तसेच वाल्मिक कराडला मंत्री धनंजय मुंडे व त्यांचा पक्ष (राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)) पाठिशी घालत असल्याचा आरोप विरोधकांनी केला. या मोर्चात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड हे देखील सहभागी झाले होते. पण राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार पक्ष) नेत्या रुपाली ठोंबरे यांनी या मोर्चावर शंका उपस्थित केली. तसेच आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. रुपाली ठोंबरे यांनी एक्सवर (ट्विटर) एक कथित व्हॉट्सअॅप चॅटचा स्क्रीनशॉट शेअर केला आणि जितेंद्र आव्हाड हे देशमुख हत्या प्रकरणात कुटुंबाला न्याय देण्यासाठी आले होते की आग लावण्यासाठी आले होते, असं म्हणत हल्लाबोल केला. दरम्यान, यावर आता जितेंद्र आव्हाड यांनी कथित व्हॉट्सअॅप चॅटसंदर्भात काही सवाल उपस्थित केले आहेत. "मोर्चातील माझं भाषण संपल्यानंतर लगेच व्हॉट्सअॅप चॅट स्क्रीनशॉट बाहेर कसा आला? मग त्याआधी सकाळी स्क्रीनशॉट का नाही आला?", असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

"आपल्याला कालपासून धमक्यांचे मेसेज येत असल्याचा दावा जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केला आहे. आव्हाड म्हणाले, "मला आताही एक मेसेज आला आहे. अतिशय अर्वाच्य भाषेत मेसेज आणि मारायची धमकी व शिवीगाळ करणारा मेसेज मला आहे. यावरून असं दिसतं की अजूनही मस्ती गेलेली नाही. आता हा थेट धमकीचा मेसेज आला आहे. मी हा मेसेजही पोलिसांना पाठवणार आहे. कुठेही यंत्रणेची भिती राहिलेली नाही. मग काय तर द्या धमकी. मात्र, मी असा न घाबरणारा आमदार आहे. मला शिव्या दिल्या तरी मी माझ्या मुद्यांवरून बाजूला होणार नाही. मी अजूनही सांगतो की माझी लढाई ही माणुसकीची आहे", असंही जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींची संपत्ती जप्त करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात

बीड, दि. २९ प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांनी निर्घुण हत्या करण्यात आल्यानंतर संपूर्ण राज्यभरातून संताप व्यक्त करण्यात येतोय. बीड जिल्ह्यात शनिवारी सर्व पक्षीय नेत्यांकडून आणि राज्यभरातील नागरिकांकडून मोर्चा काढण्यात आला होता. त्यानंतर निषेध सभेतून सर्वपक्षीय नेत्यांकडून संताप देखील व्यक्त करण्यात आला होता. दरम्यान, बीडमध्ये मोर्चा निघाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील फरार आरोपींची संपत्ती जप्त करण्याचे आदेश सीआयडीला दिले होते. आज या प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे.



मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी फरार असलेल्या तीन आरोपींच्या मालमत्तेची माहिती गोळा करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. सध्या प्रशासनाने संबंधित आरोपींच्या मालमत्तेचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे. प्रशासनाकडून फरार आरोपींची मालमत्ता जप्त केली जाणार आहे.

सुदर्शन चंद्रभान घुले (26 वर्ष, रा. टाकळी) कृष्णा शामराव आंधळे (27 वर्ष मैंदवाडी ता. धारूर), सुधीर सांगळे (रा. टाकळी) अशी संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपींची नावे आहेत. बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष पंडितराव देशमुख यांची 9 डिसेंबर 2024 रोजी हत्या करण्यात आली होती. शिवाय त्यापूर्वी त्यांचे अपहरण करण्यात आले होते. दरम्यान, या हत्याप्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असलेल्या वाल्मिक कराड यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले असून ते अद्याप फरार आहेत. पोलिसांना फरार आरोपींचा शोध घेण्यास अपयश आले आहे. मात्र, देवेंद्र फडणवीस यांनी आदेश दिल्यानंतर आता सीआयडीकडून फरार आरोपींची संपत्ती जप्त करण्यास सुरुवात झाली आहे.

# शिवसेनेचे माजी खासदार सतीश प्रधान यांचे निधन

ठाणे, दि. २९ प्रतिनिधी

ठाणे नगरपालिकेचे नगराध्यक्ष, ठाणे महानगरपालिकेचे प्रथम महापौर, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यासोबत शिवसेनेच्या जडणघडणीत मोलाची भूमिका बजावणारे शिवसेनेचे माजी राज्यसभा खासदार सतीश प्रधान यांचे रविवारी दुपारी ठाण्यात वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८५ होते. त्यांच्या पश्चात मुलगा कमलेश, सून मानसी, मुलगी, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. प्रधान यांनी ठाणे शहराच्या विकासात तसेच शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीत मोठे योगदान दिले होते. त्यांच्या निधनाने बाळासाहेब ठाकरे यांच्यासमवेत काम केलेल्या शिवसैनिकांपैकी जुना - जाणता शिवसैनिक हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

१९७४-८१ या कार्यकाळात ठाण्याचे पहिले नगराध्यक्ष म्हणून सतीश प्रधान यांनी काम पाहिले. शहरात शिवसेनेची पाळेमुळे रुजवण्यात त्यांचा मोठा वाटा होता. त्यानंतर १९८६-८७ या काळात त्यांनी शहराचे पहिले महापौरपद भूषविले. यासोबत शिवसेनेचे राज्यसभा सदस्य, संसदीय गटनेते आणि केंद्रातील विविध समित्यांवर त्यांनी काम केले.



यासोबतच शहरातील विविध क्रीडा संस्थांचे प्रमुख म्हणून प्रधान यांनी काम पाहिले.

ठाण्यातील मुलांच्या शैक्षणिक जडणघडणीसाठी सतीश प्रधान यांनी ज्ञानसाधना महाविद्यालयाची स्थापना केली. गेल्या काही महिन्यांपासून ते आजारी होते. त्यामुळे सक्रिय राजकारणापासून ते अलिप्त होते. रविवारी, दुपारी ठाण्याच्या खासगी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी सकाळी दहा वाजता ठाण्यातील जवाहरबाग स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

पूर्वी राज्य सरकारचे सर्व जीआर इंग्रजीतून पाठविले जात. १९७४ साली सतीश प्रधानांनी या इंग्रजी जीआरला कडाडून विरोध करत ते मराठीत पाठवा नाही, तर उग्र आंदोलन करू, असा इशारा सरकारला दिला. त्यानंतर राज्य सरकारने मराठीत जीआर काढण्यास सुरवात केली.

# काँग्रेसमध्ये फूट पडली आहे, जुने नेते एकाकी - शर्मिष्ठा मुखर्जी



नवी दिल्ली, दि. २९ वृत्तसंस्था

माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांची कन्या शर्मिष्ठा मुखर्जी यांनी रविवारी आरोप केला की, काँग्रेसची घसरण झाली असून पक्षाने दुर्दैवी परिस्थितीवर आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. पक्षाच्या सद्यस्थितीबद्दल खंत व्यक्त करताना शर्मिष्ठा म्हणाल्या की, आज काँग्रेसचे अनेक जुने कार्यकर्ते पक्षापासून अलिप्त वाटत आहेत कारण सर्वोच्च नेत्यांमध्ये विचारसरणीचा अभाव आहे.

वडिलांच्या निधनानंतर काँग्रेस कार्यकारिणीची बैठक का बोलावली नाही आणि ठराव का मंजूर झाला नाही, असा प्रश्नही शर्मिष्ठा यांनी उपस्थित केला. वडिलांच्या निधनानंतर सीडब्ल्यूसीची बैठक बोलावली नाही तेव्हा वाईट वाटले, असे तो म्हणाला.

याचे उत्तर काँग्रेसला द्यावे लागेल, असे ते म्हणाले. मी फक्त एकच वस्तुस्थिती मांडू शकते. पण मी हे देखील सांगू इच्छिते की हे जाणूनबुजून होते की निष्काळजीपणा होता हे मला माहित नाही. एवढ्या जुन्या पक्षात काय परंपरा आहेत? शर्मिष्ठा मुखर्जी म्हणाल्या, जर (काँग्रेस नेते) राहुल गांधी आणि त्यांच्या जवळच्या लोकांना या परिस्थितीत काँग्रेसने कसे काम केले हे माहित नसेल, तर ही काँग्रेसमधीलच गंभीर आणि दुःखद परिस्थिती आहे.

## कलबुर्गी कॉन्ट्रॅक्टर मृत्यू प्रकरणी प्रियांक खर्गे यांच्या निकटवर्तीयांसह 6 जणांवर गुन्हा दाखल

बंगळुरू, दि. २९ वृत्तसंस्था

कर्नाटकचे मंत्री प्रियांक खर्गे यांचे निकटवर्तीय राजू कापनूर आणि अन्य पाच जणांविरोधात भाजप आमदार बसवराज मट्टीमाडू आणि इतर नेत्यांना ठार मारण्याचा कट रचल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती पोलिसांनी रविवारी दिली.

हा गुन्हा सिव्हिल कंत्राटदार सचिन पांचाळ यांच्या आत्महत्येपूर्वीच्या चिठ्ठीच्या आधारे नोंदवण्यात आला आहे. या चिठ्ठीत सचिन यांनी काँग्रेस नेत्यांनी मट्टीमाडू, अंडोळा मठाचे सिद्धलिंग स्वामी, भाजप नेते मणिकांत राठोड आणि चंदू पाटील यांना ठार मारण्याचा कट रचल्याचा आरोप केला आहे.

बिदरमधील कंत्राटदार सचिन पांचाळ यांनी गुरुवारी रेल्वेच्या रुळावर झोपून आपले जीवन संपवले, असा आरोप आहे. त्यांच्या आत्महत्येच्या चिठ्ठीत त्यांनी राजू कापनूर आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप केला आहे.

# काँग्रेसच्या दबावाखाली स्मारकाची अधिसूचना

## पवन खेडांचा भाजपवर निशाणा

नवी दिल्ली, दि. २९ वृत्तसंस्था

देशाचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे पार्थिव पंचतत्वात विलीन झाले आहे. काँग्रेस आणि भाजपमध्ये शब्दयुद्ध सुरू आहे. काँग्रेसचे प्रवक्ते पवन खेडा म्हणाले की, भाजप अध्यक्ष जेपी नड्डा आणि केंद्रीय मंत्री हरदीप पुरी माजी पंतप्रधानांचे स्मारक उभारण्याच्या नावाखाली स्वस्त राजकारण करत आहेत, हे दुर्दैव आहे.

खेडा म्हणाले, राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांनीही शक्तीस्थळावरून जमीन देऊ केली. डॉ. मनमोहन सिंग यांचे अंत्यसंस्कार अशा ठिकाणी व्हावेत, जिथे त्यांचे स्मारक बांधले जावे, एवढीच त्यांची इच्छा होती. ज्या व्यक्तीवर अंत्यसंस्कार केले जात आहेत त्यांच्या कुटुंबाकडे लक्ष दिले जात नाही, असा आरोप त्यांनी केला.

त्यांनी विचारले, 'पीएमकडे नेहमी लक्ष देणे आवश्यक आहे का?' पवन खेडा यांच्या मते जेपी नड्डा आणि हरदीप सिंग पुरी स्वस्त राजकारण करत आहेत. काँग्रेसच्या दबावानंतरच भाजपने स्मारक बांधण्याची अधिसूचना जारी केल्याचे ते म्हणाले.

या प्रकरणी काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले की, माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी देशाला चांगले बनवले आणि लोकांना नवी आशा दिली हे सत्तेतील लोकांनी समजून घेतले पाहिजे. ते म्हणाले, 'जे आज सत्तेत आहेत, जे



गेल्या दोन दिवसांपासून डॉ.मनमोहन सिंग यांचे गुणगान करत आहेत आणि त्यांच्या योगदानाचे स्मरण करत आहेत, त्यांनी डॉ.मनमोहन सिंग यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहावे.'

रमेश म्हणाले, 'नोटाबंदीवरील त्यांच्या 4 मिनिटांच्या भाषणाने सरकार हादरले. विरोधी पक्षात असताना ते फार काही बोलत नसत, पण ते बोलले की सगळे ऐकायचे. लाल बहादूर शास्त्री यांच्याबद्दल असे म्हटले जाते की, त्यांना शत्रू नव्हते, मी डॉ.मनमोहन सिंग यांच्याबद्दलही असेच म्हणू शकतो.

तत्पूर्वी केंद्रीय मंत्री हरदीप पुरी म्हणाले, 'सरदार डॉ. मनमोहन सिंग यांच्या अंत्यसंस्कारांबाबत समांतर कथा निर्माण करणारे त्यांच्या स्मृतीवर आणि माणूस म्हणून त्यांच्या चारित्र्यावर मोठा अन्याय करत आहेत.'

पुरी म्हणाले, डॉ. मनमोहन सिंग यांचे पार्थिव तिरंग्यात आणि पूर्ण राज्य आणि लष्करी सन्मानाने अंत्यसंस्कार करण्यात आले. २१ तोफांची सलामी देण्यात आली. सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. डॉ. मनमोहन सिंग हे नेहमीच आपल्यासाठी प्रेरणादायी नेते राहतील. आम्ही त्याच्या आठवणी आणि मूल्ये जपणार आहोत. ते म्हणाले, 'जे काँग्रेस पक्षाचे लोक वाद आणि खोटे बोलून या गंभीर क्षणाची प्रतिष्ठा आणि शांतता बिघडवत आहेत त्यांनी असे करणे टाळावे आणि आत्मपरीक्षण करावे, असे पुरी म्हणाले होते.

# भारतीय लष्करातर्फे 14,300 फूट उंचीवर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा स्थापित



लडाख, दि. २९ वृत्तसंस्था

भारतीय लष्कराने पूर्व लडाखमध्ये 14,300 फूट उंचीवर असलेल्या पँगॉन्ग तलावाच्या काठावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा स्थापित केला आहे. हे ठिकाण प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ (LAC) आहे जिथे चीनसोबत बराच काळ तणावपूर्ण परिस्थिती होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अखंड धैर्याचा आणि त्यांच्या ऐतिहासिक वारशाचा गौरव करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. 14 कॉर्प्सचे जनरल ऑफिसर कमांडिंग लेफ्टनंट जनरल हितेश भल्ला यांच्या हस्ते या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. 14 कोर याला "फायर अँड फ्युरी कोअर" असेही म्हणतात. यावेळी त्यांनी शिवाजी महाराजांच्या धोरणात्मक कौशल्याला आणि नेतृत्वाला आदरांजली वाहिली. हा कार्यक्रम येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा देईल, असे लष्कराच्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे. भारत आणि चीनने डेमचोक आणि डेपसांग या दोन ठिकाणांहून सैन्य मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली असतानाच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे उद्घाटन करण्यात आले आहे. अशा स्थितीत चार वर्षांपासून सुरू असलेला सीमावाद सोडवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण प्रगती म्हणून या पाऊलाकडे पाहिले जात आहे. पँगॉन्ग लेक परिसरात 2020 मध्ये सुरू झालेल्या सीमावादानंतर हे ठिकाण सामरिक दृष्टिकोनातून खास बनले आहे. 21 ऑक्टोबर रोजी, भारत आणि चीनने एका करारानुसार सैन्य माघारी पूर्ण केले, ज्यामुळे दोन्ही देशांमधील तणाव कमी झाला. या पुतळ्याची स्थापना भारतीय लष्कराचा संकल्प आणि छत्रपती शिवरायांची प्रेरणा दर्शवते. या पुतळ्याच्या माध्यमातून भारतीय लष्कराने शिवरायांच्या ऐतिहासिक वारशाचा तर सन्मानच केला नाही तर आजच्या लष्करी क्षेत्रात त्यांची लष्करी रणनीती आणि अदम्य धैर्य यांचा समावेश करण्याचा प्रयत्न केला आहे. हा पुतळा येणाऱ्या पिढ्यांसाठी शिवरायांच्या विचारांचे आणि देशभक्तीचे प्रतीक राहील.

## संक्षिप्त

### विसापूर किल्ला परिसरात चिमुकलीवर अत्याचार

पवनानगर, दि. २९ : प्रतिनिधी

विसापूर किल्ला परिसरात राहणाऱ्या पाच वर्षांच्या चिमुकलीला चॉकलेटचे आमिष दाखवून छोट्या हॉटेलमागे नेऊन बंदोबस्तावरील पोलिस शिपायाने लैंगिक अत्याचार केला. सचिन वसंत सस्ते (वय ४३, सध्या रा. मुहम्मदवाडी, हडपसर, पुणे. मूळ रा. जेजुरी, पुरंदर) असे त्याचे नाव आहे. लोणावळा ग्रामीण पोलिसांनी त्याला अटक केली असून, गुरुवारी त्याला निलंबित करण्यात आले . लोणावळा उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्र मायने यांनी दिलेल्या माहितीनुसार, नाताळ व नवीन वर्षाच्या आगमनानिमित्त मावळ तालुक्यातील पर्यटन स्थळांवर पोलिसांकडून जादा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. लोणावळा ग्रामीण पोलिसांच्या हद्दीतील विसापूर किल्ल्यावरही पुणे ग्रामीण मुख्यालयातून जादा बंदोबस्त मागविण्यात आला होता. त्यानुसार पोलिस कर्मचारी सचिन सस्ते पुणे मुख्यालयातून लोणावळा ग्रामीण पोलिस ठाण्यामध्ये बंदोबस्ताच्या कामाकरिता आला आहे. त्याची नेमणूक लोहगड-विसापूर किल्ला परिसरात आहे. सस्ते याने बुधवारी विसापूर किल्ला पायथ्याशी खेळणाऱ्या पाच वर्षांच्या मुलीला चॉकलेटचे आमिष दाखवले. त्या परिसरातील दुकानाच्या मागील निर्मनुष्यस्थळी नेले आणि तिच्यासोबत दारूच्या नशेमध्ये अश्लील चाळे केले. मुलीने हा प्रकार पालकांना सांगितल्यानंतर मुलीच्या नातेवाइकांनी पोलिसांत तक्रार केली. याप्रकरणी बुधवारी रात्री उशिरा लोणावळा ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुरुवारी सकाळी सस्ते याला अटक करण्यात आली. त्यानंतर त्याला निलंबित करण्यात आले.

### तब्बल 136 कोटींचा गंडा; सायबर चोरट्यांनी पुणेकरांना लुटले, पोलिसांकडून केवळ 74 लाखांची वसुली

पुणे, दि. २९ : प्रतिनिधी

दिवसेंदिवस सायबर फसवणुकीच्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत असून, लोन ॲप, टास्क फ्रॉड, शेअर गुंतवणुकीतील ज्यादा पैशांचे आमिष तसेच सेक्सस्टॉर्शनसारख्या नानाविविध क्लुप्त्या वापरून अभियंत्यांसह नोकरदार, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना ऑनलाईन गंडा घातला जात आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये सायबर गुन्हेगारीचा ट्रेंड बदलला असून, 'डिजिटल ॲरेस्ट'च्या कारवाईची भीती घालून लाखो रुपये पाठविण्यास लोकांना भाग पाडले जात आहे. पुण्यात वर्षभरात १३६ कोटी ७३ लाख ६६ हजार ४१९ रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याची आकडेवारी समोर आली असून, त्यातील केवळ ७४ लाख २७ हजार २९२ रुपयांची वसुली करण्यात पुणेपोलिसांना यश मिळाले आहे. आर्थिक व सायबर गुन्हे शाखेकडे सायबर फसवणुकीच्या १४० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

पुण्यातील सामाजिक कार्यकर्ते विहार दुर्वे यांनी पुण्यातील आर्थिक व गुन्हे शाखेकडे सायबर फसवणुकीसंदर्भात माहिती अधिकारांतर्गत मागवलेल्या माहितीमधून ही बाब समोर आली आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा सायबर फसवणुकीच्या रकमेच्या आकड्याने जवळपास शंभर कोटींचा आकडा पार केला आहे. भारतीय स्टेट बँक, मुंबईकडून दुर्वे यांना माहिती अधिकारात दिलेल्या माहितीनुसार, पुण्यात वर्षभरात डेबिट / क्रेडिट कार्ड हॅक करून ग्राहकांच्या बँकेतील खात्यातून २ लाख ३५ हजारांची फसवणूक करण्यात आली असून, बँकेकडून ५ कार्ड ब्लॉक करण्यात आली आहेत. तर इंटरनेट बँकिंगद्वारे खात्यातून १ कोटी १७ लाख ७८ हजार रुपयांची रक्कम काढण्यात आली आहे. त्यामुळे बँकेने ८५ खाती ब्लॉक केली आहेत. सायबर फसवणुकीचे वाढते हे आकडे पाहिल्यानंतर आगामी वर्षात सायबर गुन्हेगारी रोखणे हे पोलिसांसमोरील मोठे आव्हान ठरणार आहे.

### गोळीबार करून खुनाचा प्रयत्न करणारे आरोपी अटकेत

ठाणे, दि. २९ : प्रतिनिधी

दोन वर्षापूर्वी व्यवसायातील आर्थिक देवाण-घेवाणीतून संदीप अडसूळ यांच्यावर गोळीबार करून त्यांच्या खुनाचा प्रयत्न करून पसार झालेल्या आरोपीला त्याच्या टोळीसह जेरबंद केल्याची माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस उपायुक्त अमरसिंह जाधव यांनी गुरुवारी दिली. गेल्या अनेक दिवसांपासून ते उत्तर प्रदेशात राहत होते. सर्व आरोपींना ३० डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश ठाणे न्यायालयाने दिले आहेत. अडसूळ यांच्यावर ठाण्यातील माजिवडा येथील गणेश वंदन इमारतीसमोर घराच्या बाहेर दरवाजासमोर असतांना ७ ऑक्टोंबर २०२२ रोजी रात्री एका अनोळखी व्यक्तीने रिव्हॉल्व्हरमधून गोळी झाडली होती. ही गोळी अडसूळ यांच्या उजव्या बरगडीला लागल्याने ते या गोळीबारात गंभीर जखमी झाले होते. या घटनेनंतर गोळीबार करणाऱ्याने घटनास्थळावरून पळ काढला होता. हा गोळीबार प्रतीक शर्मा याने त्याच्या साथीदारांच्या मदतीने केल्याचे तपासातून समोर आले होते. या दोघांचाही इमारतीला लागणारे मटेरियल पुरवठा करण्याचा व्यवसाय होता. व्यवसायातील स्पर्धेतून प्रतीकने त्यांच्यावर हा हल्ला केला होता. याप्रकरणी कापूरबावडी पोलिस ठाण्यात हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल झाला होता तेव्हापासून गोळीबार करणारा प्रतीक हा त्याच्या साथीदारांसह गेल्या दोन वर्षांपासून पोलिसांना गुंगारा देत फरार झाला होता. दरम्यान, यातील आरोपी प्रतीक हा कोलशेत परिसरात येणार असल्याची माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाला मिळाली. त्याच माहितीच्या आधारे कोलशेत खाडी रोड भागातून सहायक पोलिस आयुक्त शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने २५ डिसेंबरला सापळा लावून आरोपी प्रतीक याच्यासह त्याचे साथीदार राजकुमार गोविंद हांडे (३२), आकांत पोवळे (२५), तुषार पवार ( ४९) आणि रोहित गंगोत्रे (२६) यांना अटक केली.

# कायद्यात सूट दिल्याने पादचाऱ्यांना फुटपाथ मिळेनात

उल्हासनगर, दि. २९ : प्रतिनिधी

उल्हासनगर शहरातील रस्त्यांना फुटपाथ आहेत, मात्र हे फुटपाथ दुकानदारांनी आपल्या ताब्यात घेतल्याने पादचाऱ्यांना मुख्य रस्त्यावरून मार्ग काढावा लागतो. पालिकेची कारवाई सुरू झाल्यावर दुकानदार आपलं सामान आत मध्ये घेतात आणि पालिका कर्मचारी निघून गेल्यावर पुन्हा फुटपाथचा ताबा घेतात. त्यामुळे पालिका कारवाई करते की कारवाईचे ढोंग करते, असा प्रश्न शहरवासीयांना पडला आहे.

उल्हासनगर महापालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बाजारपेठा आहेत. या बाजारपेठांमध्ये फूटपाथ हे रस्त्याच्या दुतर्फा आहेत. मात्र त्याच्याच बाजूला दुचाकी उभ्या केल्या जातात. त्यामुळे फुटपाथपर्यंत जायला रस्ताच नसतो. त्यातच दुकानदारांनी फुटपाथवर पत्रे टाकून दुकानाचे नाव थेट रस्त्यावर लावले आहे. त्यामुळे फुटपाथ हा आमच्याच मालकीचा आहे असे व्यापाऱ्यांना वाटते. याच अविर्भावात दुकानदार हे फुटपाथवर आपल्या वस्तू मांडतात. पालिका प्रशासनाने अशा प्रकारे वस्तू मांडणाऱ्यांवर कारवाई सुरू केली. तेव्हा या दुकानदारांनी आमची दुकानं छोटी आहेत, असा युक्तिवाद करत फुटपाथ सोडण्यास साफ नकार दिला.

पालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने ही व्यापारी नेत्यांच्या दबावाखाली तिथून कारवाई न करताच पळ काढल्याचे भरपूर वेळा पाहायला मिळाले आहे. चप्पल विक्रेते तर कहरच करतात. ते धाग्याला चपला लटकवून फुटपाथवर प्रदर्शन मांडतात. कोणी फुटपाथवर चालायचा प्रयत्न तरी केला तर या चपलांचा प्रसाद डोक्याला लागतो. पालिकेने येथे कारवाई करण्यात सुरुवात केली. तेव्हा देखील दुकानदारांनी आमची दुकाने छोटी आहेत, आम्ही डिस्प्ले कुठे लावायचा असा प्रश्न उपस्थित केला. त्यावरही उपाय म्हणून थेट फुटपाथ वर सहा फुटांच्यावर चपला लटकवायला पालिका प्रशासनाने परवानगी दिली.

दुकानदारांनी कायद्यात सूट मिळवली, मात्र चपला मात्र पादचाऱ्यांच्या डोक्याला लागतील त्याच उंचीवर लटकवत आहेत. त्यामुळे कारवाईचा शून्य फायदा पादचाऱ्यांना झाल्याचे दिसून येत आहे. दुकानांसमोर ठेवलेला जाळ्या ह्या तर ग्राहकांसाठी रेड कारपेट. दुकानासमोर कोणीही दुचाकी लावू नये यासाठी लोखंडाच्या जाळ्या ठेवल्या जातात. या जाळीवरही पालिकेने कारवाई करायला सुरुवात केली. त्यावेळी व्यापारी आणि पालिका यांच्यामध्ये समझोता झाला. दुकानासमोर रस्त्यावर ठेवायची जाळी ही तीन फूट लांब आणि एक फूट रुंद असावी असे ठरले. हा समझोता ही बेकायदेशीर, कारण रस्ता अडवण्याची ही तरतूद महाराष्ट्र महापालिका अधिनियममध्ये कुठेच नाही. व्यापाऱ्यांनी समझोत्यानुसार जाळी बनवली आणि उभी ठेवायच्या ऐवजी तीन फूट आडवी ठेवत आपली मनमानी मात्र चालूच ठेवली.

**टोइंगला आमदारांचा विरोध**

पालिका प्रशासन हे व्यापाऱ्यांच्या प्रेमात त्यांना सूट देत असतानाच वाहतूक विभाग कसा मागे राहील. नेहरू चौक ते सीरू चौक या रस्त्यावर फुटपाथच्या बाजूला दुचाकी उभ्या केल्या जातात. या दुचाकीच्या रांगेच्या मागे आडवी एक दुचाकी उभी करायला वाहतूक विभागाने परवानगी दिली आहे. ती कोणत्या नियमात दिली हे मात्र अद्याप आतापर्यंत वाहतूक पोलिसांनी सांगितलेले नाही. याच नियमाचा फायदा घेत व्यापारी आडव्या दोन दोन दुचाकी उभ्या करतात. वाहतूक पोलिसांनी किती मनावर घेतलं तरी आमदार कुमार आयलानी यांच्या दबावाखाली ते कारवाई करू शकत नाहीत. आमदारांनी टोइंगला विरोध केला असल्यामुळे रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांना वाहतूक अडविण्याचा पूर्ण अधिकार मिळाला आहे.

**कायद्याची कठोर अंमलबजावणी करणारा लॉ मॅन हवा**

कधीतरी वाहतूक पोलीस ही पार्किंग बघून चिडतात आणि पाचशे रुपयांचा दंड मारून पुढे जातात. उल्हासनगर शहराला विकास ढाकणे यांच्या रूपात इन्फ्रास्ट्रक्चर मॅन मिळाला, मात्र त्याऐवजी शहराला कायद्याची कठोर अंमलबजावणी करणारा लॉ मॅन हवा आहे. ढाकणे यांनी यापूर्वी पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेत अतिरिक्त आयुक्त म्हणून सेवा दिली आहे. या दोन्ही महानगरपालिका 11 डिसेंबर हा पादचारी दिवस म्हणून साजरा करतात. मात्र ढाकणे यांनी उल्हासनगर महापालिकेत आयुक्त पदाचा पदभार स्वीकारल्यावर पादचाऱ्यांच्या हक्काचा फुटपाथ असतो, याचा विसर पडला आहे.

# ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी तुफान गर्दी

मुरुड जंजिरा, दि. २९ : प्रतिनिधी



मुरुड हे पर्यटनाचे क्षेत्र असल्याने नाताळाची सुट्टी साजरी करण्यासाठी आज शेकडोंच्या संख्येने विविध जिल्हयातुन पर्यटक मुरुड राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी तुफानी गर्दी केली आहे. नुकतेच गेट वे ऑफ इंडियाला झालेल्या बोट अपघातामुळे जंजिरा किल्ल्यात जाताना सुरक्षा जॅकेट सक्तीचे करायणात आहे आहे.

गेटवे ते एलिफंटा या ठिकाणी जाताना पर्यटकांच्या बोटीला नेव्ही च्या बोटीने जोरदार धडक दिल्याने बोट फुटुन या मध्ये लहान मुलांसह 13 जणांचा समुद्राच्या पाण्यात बुडून मृत्यु झाल्याने पॅसेंजर बोटीत संख्ये पेक्षा जास्त प्रवासी घेऊन नये तसेच प्रत्येक पॅसेंजरला सेफ्टी जॅकेट घातल्याशिवाय प्रवास करु देऊ नये असा आदेश शासनाकडून काढल्याने राजपुरी येथील बंदर निरीक्षक सतिष देशमुख यांनी या आदेशाचा पालन करत राजपुरी जेट्टीवरुन आज प्रत्येक बोटीत संख्यानुसार ते पण प्रत्येक पर्यटकांना सेफ्टी जॅकेट घालून बोटीत प्रवेश दिला जात होता. ज्या बोटीत लहान मुलांना सेफ्टी जॅकेट नसतील त्या बोटींना परवानगी नाकारल्याने तिकीट कार्यालया जवळ गोंधळ उडाला आणि पर्यटकांनी नाराजी दर्शवली.

काही पर्यटकांनी बंदर निरीक्षक यांना घेराव घालून लहान मुलांना सोडण्यास विनंती केली आमच्या जबाबदारी वरघेऊन जातो. परंतु बंदर निरीक्षक यांनी साफ नकार दिल्याने बंदर निरीक्षक यांना पर्यटकांच्या रागाला सामोरे जावे लागले. यावेळी मुरुड पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांनी जेट्टीवर येऊन किल्लाचे फोटो काढून परतावे लागले.

**बोटीत लहान मुलांना नो एन्ट्री**

आज मुंबई , पुणा, सातारा, पनवेल, नाशिक, वाई आदिंसह राज्यातुन पर्यटकांनी आप आपल्या गाड्या घेऊन सकाळच्या दरम्यान किल्ला पाहण्यासाठी आले असता. बोटीत लहान मुलांना नो एन्ट्री केल्याने पर्यटकांनी नाराजी दर्शवली.

### नवी मुंबईत 1 अब्ज 37 कोटींहून अधिक रुपयांची सायबर लूट

नवी मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी

नवी मुंबईत जानेवारी ते नोव्हेंबर या केवळ ११ महिन्यात १ अब्ज ३७ कोटी ८० लाख ६२ हजार ३१७ रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाली आहे. तर ४० कोटी ४३ लाख ४४ हजार ४५६ एवढी रक्कम गोठविण्यात पोलिसांना यश आले. ११ महिन्यात ज्यांच्या विरोधात गुन्हे दाखल आहेत अशा ६२ जणांना आतापर्यंत अटक करण्यात आली आहे. कमी गुंतवणुकीवर भरघोस नफा मिळवण्याचा मोह, आणि सायबर गुन्ह्याबाबत अज्ञान या मुख्य कारणांनी ही फसवणूक झाली असून तक्रार उशिरा देणे आणि तपास अत्यंत किचकट असल्याने गुन्हेगारांचे फावते आहे. सट्टा बाजारात गुंतवणूक करा अल्पवधीत भरघोस परतावा मिळावा, आम्ही पाठवलेल्या यु ट्यूब लिंकला लाईक सबस्क्राईब करा घरबसल्या रिवॉर्ड मिळवा, केवळ पॉईंट द्या आणि लाखो रुपये कमवा अशा फसव्या जाहिरातींना बळी पडलेल्या लोकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक केली जात आहे. तसेच केंद्रीय अन्वेषण किंवा सीआयडी मधून बोलत असल्याची थाप मारत डिजिटल अटक, तुमच्या खात्यातून अतिरेक्यांना पैसे गेले आहेत अशी धमकी देत पैसे घेतले जातात. तसेच ऑनलाइन कॅमेरा चॅटिंग मध्ये अश्लील बोलून बीभत्स चाळे करण्यास भाग पाडणे आणि त्याची रेकॉर्डिंग करून पैशांची मागणी करणे असेही प्रकार घडले आहेत. यावर्षीची आकडेवारी चक्रावणारी असून ऑनलाइन फ्रॉडचे ३५२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात ३७ गुन्हे उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. जानेवारी ते नोव्हेंबर या केवळ ११ महिन्यात १ अब्ज ३७ कोटी ८० लाख ६२ हजार ३१७ रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाली आहे.

# जेएनपीए- मुंबई सागरी मार्गावर अत्याधुनिक स्पीड बोटी, 35-40 मिनिटांत प्रवास शक्य


नवी मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी

जेएनपीएने लाकडी प्रवासी बोटींना सरत्या वर्षात अलविदा करण्याचा निर्णय घेतला आहे. नविन वर्षांपासून बंदरातून मुंबईत प्रवाशांना घेऊन जाण्या येण्यासाठी अद्यावत स्पीड बोटी धावणार आहेत. या प्रदूषण विरहीत रहित स्पीडबोटीमुळे 35-40 मिनिटांत प्रवाशांना जेएनपीए-मुंबई दरम्यान पोहचता येणार आहे. याचा फायदा या सागरी मार्गावरुन प्रवास करणाऱ्या सर्वांनाच होणार आहे.

जेएनपीए बंदरातून मुंबईत येण्याजाण्यासाठी याआधी लाकडी बोटींची व्यवस्था आहे. ही सागरी व्यवस्था जेएनपीएचे कामगार, प्रकल्पग्रस्त, कस्टम, एअरफोर्स, सीआयएसएफ आणि फॅमिली मेंबर्स, पोर्ट युजर्स आदी कामगारांसाठी उपयुक्त ठरत होती. सकाळी सहा वाजल्यापासून रात्री दहा वाजेपर्यंत या सागरी मार्गावरुन लाकडी बोटी सोळा राऊंड ट्रीप प्रवासी वाहतूक करीत होत्या. यासाठी जेएनपीए दरमहा 19 लाख 68 हजार खर्च करीत आहे. दरम्यानच्या काळात उरण पर्यंत रेल्वे सुरू झाली आहे. त्याशिवाय वाहतुकीसाठी अटल सेतूही खुला झाला आहे. यामुळे या जेएनपीए- गेटवे (मुंबई) या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक रोडावली आहे. त्यानंतर जेएनपीएनेही बोटींची संख्या कमी करुन आता मागील काही महिन्यांपासून आठपर्यंत आणून सोडली आहे. मात्र त्यानंतरही प्रवासी संख्या घसरणीलाच लागली आहे. त्यामुळे प्रवासी संख्या कमी झाल्याने व लाकडी बोटी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातूनही उपयुक्त नसल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे अंतर्मुख होऊन जेएनपीए प्रशासनाने लाकडी प्रवासी बोटी बंद करण्याचा निर्णय घेऊन त्याजागी प्रदुषणविरहित इलेक्ट्रॉनिक बॅटऱ्यांवर चालणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञान व सोयी सुविधांनी सुसज्ज असलेल्या स्पीडबोटींचा पर्याय स्वीकारला आहे.

जेएनपीएने इलेक्ट्रॉनिक बॅटऱ्यांवर चालणाऱ्या प्रदुषण विरहीत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर असलेल्या दोन फायबरच्या हलक्या स्पीडबोटी 10 वर्षांच्या कालावधीसाठी पुरवठा करण्याचा प्रस्ताव तयार केला होता. माझगाव डॉक बिल्डर्स लिमिटेड कंपनीने या प्रस्तावाला प्रतिसाद देऊन दोन स्पीड बोटी पुरवठा करण्याची हमी दिली आहे. उन्हाळी हंगामात 20-25 प्रवासी व पावसाळी हंगामात 10-12 क्षमतेच्या हरित सागर आणि हरित नौका या दोन वेगवान बोटी नवीन वर्षाच्या फेब्रुवारीच्या सुरुवातीलाच प्रवासी वाहतूकीसाठी जेएनपीटीच्या सेवेत दाखल होणार आहेत.'

प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून स्पीडबोटींमुळे जेएनपीए- मुंबई दरम्यानचा सागरी प्रवास अवघ्या 35 ते 40 मिनिटांत शक्य होणार आहे. जेएनपीएने 10 वर्षाच्या या दोन स्पीड बोटींच्या 37 कोटी 89 लाख 94 हजार 190 खर्चाच्या निधीलाही 20 डिसेंबर 2024 रोजी झालेल्या बोर्ड ऑफ ट्रस्टींच्या बैठकीत मंजूरी दिली आहे.अशी माहिती जेएनपीएचे उप संरक्षक कॅप्टन बाळासाहेब पवार यांनी दिली.



# कल्याणमध्ये खडे गोळवलीतील तळीरामांना उठा-बश्यांची शिक्षा

## गांजा व्यसनी, मद्यधुंदांविरुध्द पोलीस उपायुक्तांची मोहीम

कल्याण, दि. २९ : प्रतिनिधी

कल्याण, डोंबिवली शहर परिसरातील गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्यासाठी आता पोलीस उपायुक्त अतुल झेंडे स्वता रात्रीच्या वेळेत रस्त्यावर उतरले आहेत. गांजा, अंमली पदार्थ सेवन, मद्याचे अड्डे शोधून काढून तेथे विक्री करणाऱ्या आणि सेवन करणाऱ्या अशा दोघांना घटनास्थळी पकडून त्यांची कानउघडणी करून, त्यांना वर्दीचा दणका देऊन त्यांच्यावर फौजदारी कारवाई केली जात आहे.

कल्याण पूर्वेत बुधवारी रात्री दहा गांजा सेवन करणाऱ्यांना कोळसेवाडी पोलिसांनी पकडले होते. त्यांची कानउघडणी करून त्यांना १०० उठाबशा काढण्याची शिक्षा करून नंतर सोडण्यात आले. पुन्हा उघड्यावर कोठे गांजा किंवा अंमली पदार्थ सेवन करताना आढळले तर अटकेची कारवाईची तंबी या तळीरामांना देण्यात आली. गुरुवारी रात्री खडेगोळवली भागात आठ जणांना उघड्यावर गांजा सेवन करणाऱ्या तळीरामांना पकडण्यात आले. त्यांची 'हजेरी' उपायुक्त झेंडे यांनी घेतली.

उपायुक्तांच्या आक्रमक पवित्र्यामुळे स्थानिक पोलीस ठाण्यातील अधिकारी, पोलीस कृतीशील झाले आहेत. मागील चार वर्ष वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचा आक्रमक दणका कल्याण, डोंबिवलीतील मद्यधुंद, तळीराम, गांजा सेवन करणाऱ्यांना पाहण्यास मिळाला नव्हता. त्याची चुणूक आता उपायुक्त झेंडे यांनी दाखविण्यास सुरूवात केली आहे. या कारवाईमुळे रात्री नऊ वाजल्यापासून ते पहाटे चार वाजेपर्यंत कल्याण, डोंबिवली शहराच्या विविध भागात गांजा सेवन करणाऱ्या टवाळखोरांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

**खडेगोळवलीत धाड**

कल्याण पूर्वेतील खडेगोळवली भागात एका निर्जन ठिकाणी आठ टवाळखोर अंमली पदार्थ, मद्य सेवन करत असल्याची माहिती उपायुक्त झेंडे यांना मिळाली. या सर्वांना पकडून पोलिसांनी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात हजर केले. या सर्वांची कानउघडी करत, वर्दीचा दणका दाखवत, त्यांना १०० उठाबशा काढण्याची शिक्षा देण्यात आली. उठाबशा काढताना अनेक जण कण्हत कुथत होते. हा प्रकार परिसरातील नागरिक हास्य करत पाहत होते. उपायुक्तांच्या दणक्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करत आहे. उपायुक्तांनी एकदा डोंबिवली खाडी किनारी फेरफटका मारण्याची मागणी नागरिक करत आहेत.

नवीन वर्षानिमित्त रस्तोरस्ती मद्यधुंद मद्यपी, टवाळखोर, गर्दुल्ले नागरिकांना त्रास देण्याची शक्यता विचारात घेऊन, तसेच कल्याण परिसरातील वाढती गुन्हेगारी विचारात घेऊन उपायुक्तांनी टवाळखोरांविरुध्द मोहीम उघडली आहे.कल्याण परिसरातील लैंगिक अत्याचाराच्या घटना विचारात घेऊन आठ पोलीस ठाणे हद्दीत एकही मद्यधुंद मद्यपी, टवाळखोर, तळीराम रस्त्यावर दिसणार नाही. नागरिकांना त्यांचा त्रास होणार नाही. त्यांचे अड्डे कुठेही दिसता कामा नयेत. असे कोणी भेटले त्याला तेथेच पकडून कारवाई करण्याच्या सूचना पोलीस ठाण्यांना केल्या आहेत असे अतुल झेंडे पोलीस उपायुक्त यांनी सांगितले.

# आरोपीकडून न्यायाधिशांवर चप्पल भिरकावणे 11 पोलिसांना पडले महागात, निलंबनाची कारवाई

कल्याण, दि. २९ : प्रतिनिधी

न्यायालयीन कामकाज सुरू असतानाच कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाचे अतिरिक्त व सत्र न्यायाधीश आर. जी. वाघमारे यांच्या दिशेने कटघऱ्यात उभ्या असलेल्या खुनाच्या आरोपातील कैद्याने चप्पल भिरकावली होती. शिवाय त्याच दिवशी एक बंदूकधारी खासगी सुरक्षा रक्षक न्यायालय आवारात फिरत असल्याचा व्हिडियो समाज माध्यमांवर व्हायरल झाला होता. या दोन्ही घटनांची गंभीर दखल घेऊन कल्याण परिमंडळ 3 चे उपायुक्त अतुल झेंडे यांनी कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत न्यायालयीन कर्तव्यावरील 11 पोलिसांना गुरूवारी सेवेतून निलंबित केले. यात एका पोलिस अधिकाऱ्याचा देखिल समावेश आहे. या घटनेनंतर पोलिस दलात एकच खळबळ माजली आहे. विशेष म्हणजे चप्पल आणि बंदूकधारी या दोन्ही घटनांप्रकरणी महात्मा फुले चौक पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. खडकपाडा पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी किरण भरम किरण भरम हा सद्या आधारवाडी कारागृहात कैदी आहे. शनिवारी दुपारी कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधिश आर. जी. वाघमारे यांच्या समोर पोलिसांनी त्याला हजर केले होते. आरोपी किरण याने न्यायालयाला टेबल बदलण्याची मागणी केली.

**किरण भरम याच्या विरुध्द गुन्हा दाखल**

न्यायालयाने किरण याला वकिलामार्फत तसा अर्ज देण्यास सांगितले. ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी न्यायालयीन कर्मचाऱ्याने किरण भरम याच्या वकिलाच्या नावाचा पुकारा करून हजर राहण्याच्या सूचना केल्या. मात्र वकील न्यायालयात हजर झाला नाही. न्यायालयाने त्याला दुसरा वकील देण्याची सूचना देऊन पुढची तारीख दिली. इतक्यात आरोपी किरण भरम याने खाली वाकून पायातील चप्पल काढली आणि ती न्यायाधिश वाघमारे यांच्या दिशेने भिरकावली. पोलिस किंवा न्यायालयीन कर्मचाऱ्यांना कळण्यापूर्वीच कैद्याने ही कृती केली. चप्पल न्यायाधिशांच्या समोरील लाकडी बेंचला लागून बाजुला बसलेल्या कर्मचाऱ्याच्या समोर पडली. चप्पल फेकल्याच्या घटनेनंतर आरोपीच्या सोबत असलेले पोलिस काय करत होते ? असा सवाल उपस्थित करण्यात येत होता. या प्रकरणी महात्मा फुले चौक पोलिस ठाण्यात किरण भरम याच्या विरुध्द पोलिसांना शासकीय कर्तव्य करण्यापासून परावृत्त केल्याच्या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याच न्यायालयातील दुसऱ्या एका प्रकरणात न्यायालयीन कामासाठी आवारात आलेल्या व्यक्तीसोबत एक बंदूकधारी खासगी सुरक्षा रक्षक फिरत असल्याचा व्हिडियो समाज माध्यमांवर व्हायरल झाला होता. न्यायालयाच्या आवारात शस्त्र घेऊन फिरण्यास प्रतिबंध असताना बंदूकधारी व्यक्ती न्यायालय आवारात आलाच कसा ? असा सवाल वकिलांकडून उपस्थित करण्यात आला. याप्रकरणीही गुन्हा दाखल करण्यात आला. या दोन्ही प्रकरणांची उपयुक्त झेंडे यांच्या आदेशावरून चौकशी करण्यात आली. या चौकशीत न्यायालयीन कर्तव्यावर असलेले पोलिस कर्तव्यात कसूर आणि निष्काळजीपणा करत असल्याचे स्पष्ट झाल्याने उपायुक्त झेंडे यांनी एकूण 11 पोलिसांना गुरूवारी निलंबित केले.

न्यायालयाच्या आवारात कर्तव्यावर असलेले पोलिस कर्तव्यात कसूरी करत असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट झाले. या प्रकरणी 11 पोलिसांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याचे पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांनी सांगितले.

# स्थानक परिसरात लवकरच 'टायर किलर'

ठाणे, दि. २९ : प्रतिनिधी

एक दिशा मार्गिका असतानाही वाहतुक नियमांचे उल्लंघन करून वाहन चालक विरुद्ध दिशेने वाहतुक करत असतात. अशा वाहन चालकांना वचक बसावा यासाठी ठाणे रेल्वे स्थानक परिसरातील गावदेवी भागात महत्त्वाच्या ठिकाणी 'टायर किलर'चा प्रयोग केला जाणार आहे. ठाणे महापालिकेच्या माध्यमातून येत्या पंधरवड्यात हे टायर किलर बसविले जाणार असून विरुद्ध दिशेने वाहतुक केल्यास वाहनाच्या चाकाचे नुकसान होईल. त्यामुळे चाकाचे नुकसान टाळण्यासाठी चालक स्वत:हून विरुद्ध दिशेने वाहने चालविणार नाही असे पोलिसांनी सांगितले. हा प्रयोग यशस्वी झाल्यास ठाणे शहरातील इतर भागातही टायर किलर बसविले जाणार आहे.

ठाणे रेल्वे स्थानक परिसरात हजारो वाहनांची वाहतुक होत असते. यामध्ये रिक्षा आणि दुचाकी वाहनांचे प्रमाण अधिक असते. स्थानक परिसरातील वाहतुक सुरळीत राहावी यासाठी काही भागात एक दिशा मार्गिका वाहतुक पोलिसांनी केल्या आहेत. असे असले तरी या मार्गिकांवर वाहतुक पोलीस नसल्यास काही वाहन चालक विशेषत: रिक्षा चालक विरुद्ध दिशेने वाहने चालवून या मार्गिकांमध्ये प्रवेश करत असतात. त्यामुळे वाहतुक अडथळा होऊन कोंडी होत असते. विरुद्ध दिशेने वाहने चालविल्यास गंभीर अपघाताची शक्यता निर्माण होते.

शहरातील वाहतुक व्यवस्थेविषयी सप्टेंबर महिन्यात ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी एक बैठक घेतली होती. स्त्यावर विरुद्ध दिशेने वाहने चालविण्याच्या प्रकारांमुळे होणारे अपघात, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ठाण्यात प्रायोगिक तत्त्वावर 'टायर किलर' बसवण्याचा निर्णय त्यांनी या बैठकीत घेतला होता. त्यानुसार ठाणे महापालिका आणि वाहतुक पोलिसांनी काही क्षेत्र निश्चित करण्यास सुरूवात केली होती. त्यानुसार, ठाणे स्थानक परिसरातील शिवाजी महाराज पथ येथून गावदेवी मंदिराच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या मार्गावर आणि गावदेवी मैदानालगतच्या एक दिशा मार्गिका निश्चित केल्या आहेत. त्यानुसार, येत्या काही दिवसांत हे टायर किलर या भागात लागण्याची शक्यता आहे. टायर किलर रस्त्यावर लागल्यास विरुद्ध दिशेने वाहतुक करणाऱ्या चालकांवर वचक बसण्याची शक्यता आहे.

ठाणे रेल्वे स्थानक परिसरातील प्रयोगानंतर शहरातील इतर एकदिशा मार्गिकांवरही हे टायर किलर बसविले जाणार आहे.

# सेवासदन शिक्षण संस्थेचा रमाबाई रानडे पुरस्कार घोषित

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

सेवासदन शिक्षण संस्थेच्या वतीने दिला जाणारा विदर्भस्तरीय रमाबाई रानडे स्मृती शिक्षण प्रबोधन पुरस्कार यंदा थुगाव निपाणी येथील (ता. नरखेड) जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. धनंजय नारायणराव पकडे यांना घोषित झाला आहे. सेवासदन संस्थेच्या वर्धापनदिनी म्हणजेच दि. २ जानेवारी २०२५ ला हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. ५१ हजार रुपये रोख, स्मृतीचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

सेवासदन शिक्षण संस्था ही नागपुरातील नावाजलेली जुनी शिक्षण संस्था आहे. यावर्षी संस्था ९८ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. सेवासदन शिक्षण संस्था अनेक प्रेरणादायी व स्तुत्य उपक्रम आयोजित करीत असते. यातील एक उपक्रम म्हणजे रमाबाई रानडे शिक्षण प्रबोधन पुरस्कार सोहळा होय. यावर्षी या पुरस्काराचे 10 वे वर्ष असून, वृत्तपत्रे, अन्य माध्यमांद्वारे समाजातील कर्तृत्ववान व्यक्ती/संस्थाची माहिती, समाजातील प्रतिष्ठित मान्यवरांकडून संस्थेने शिफारसी मागवल्या होत्या. तसेच पुरस्कार निवड समितीद्वारा मूल्यांकन करून एकमताने विदर्भस्तरीय रमाबाई रानडे स्मृती शिक्षण प्रबोधन पुरस्कार 2025 साठी धनंजय नारायणराव पकडे, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, थुगाव निपाणी, यांची निवड करण्यात आली आहे.

पुरस्कार वितरण सोहळ्याला नवी दिल्लीच्या खासदार बांसुरी स्वराज प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत; तर समारंभाच्या अध्यक्षस्थानी परसिस्टंट सिस्टीमचे सिनियर व्हाईस प्रेसिडेंट शेखर पाटणकर असतील. सेवासदन शिक्षण संस्थेच्या परिसरामध्ये गुरूवार, दि. २ जानेवारी २०२५ ला सायंकाळी ५.३० वाजता हा सोहळा संपन्न होणार आहे. विदर्भ तसेच नागपूर नगरीतील शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी, युवावर्ग, विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने या समारंभाला उपस्थित राहावे, असे आवाहन सेवासदन संस्थेच्या अध्यक्ष कांचन गडकरी, सचिव वासंती भागवत यांनी व रमाबाई रानडे स्मृती शिक्षण प्रबोधन पुरस्कार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

**यापूर्वीचे मानकरी**

आतापर्यंत संज्ञा संवर्धन संस्था नागपूर, श्रीमती जिज्ञासा चवलढाल कुबडे, दीनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ यवतमाळ, अभ्युदय ग्लोबल व्हीलेज स्कूल नागपूर, श्री मंगल बहुउद्देशीय शिक्षण, तांत्रिक शिक्षण व प्रशिक्षण संस्था सावनेर, सेवासर्वदा संस्था नागपूर, उमेद एज्युशन चॅरिटेबल ट्रस्ट रोठा, वर्धा, एन्करेज एज्युकेशनल फाउंडेशन अकोला व मागच्या वर्षी भटके विमुक्त कल्याणकारी परिषद संचालित "पालावरची शाळा" कुडवा-गोंदिया इत्यादी संस्था 'रमाबाई रानडे स्मृती शिक्षण प्रबोधन पुरस्काराच्या' मानकरी ठरल्या आहेत.

स्व. रमाबाईंच्या कायार्चा वसा अव्याहत सुरु राहावा, त्यांच्या कायार्चा परिचय नवीन पिढीला व्हावा, यासाठी त्यांच्याच नावाने शिक्षणाच्या विविध क्षेत्रात निःस्वार्थपणे उल्लेखनीय व भरीव कार्य करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेला सेवासदन शिक्षण संस्थेच्या वतीने 2016 पासून विदर्भस्तरीय 'रमाबाई रानडे स्मृती शिक्षण प्रबोधन पुरस्कार' देऊन गौरान्वित करण्यात येते.

**जिल्हा परिषद शाळा, थुगाव निपाणी**

इंग्रजीचा बोलबाला झाल्याने मराठी शाळा या काळबाह्य झाल्या असल्याची ओरड होत असते. अशा परिस्थितीत लोकसहभागातून व शिक्षकांच्या प्रचंड इच्छाशक्तीच्या बळावर ग्रामीण भागातील विद्यार्थी जागतिक पातळीवर उभा करण्यासाठी सतत धडपडणारे शिक्षक अस्तित्वात आहेत, ही समाधानाची बाब आहे. अभिनव असे क्रांतिकारी प्रकल्प व उपक्रमांसाठी केवळ नागपुरात नाही, तर महाराष्ट्रात सर्वदूर नावलौकिक प्राप्त केलेली नागपूर जिल्ह्यातील थुगाव निपाणी येथील जिल्हा परिषदेची शाळा त्याचे उत्तम उदाहरण आहे.

मुख्याध्यापक श्री. पकडे सर व त्यांच्या चमूने ही शाळा लोकसहभागातून उभी केली आहे. नुकताच राज्य शासनाचा मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात रु. 1 लाख रकमेचा पुरस्कार शाळेने प्राप्त केला आहे.

# उभारते सितारे' मध्ये 'गुडबाय २०२४'



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

'उभारते सितारे' हा नवोदित कलागुणांना वाव देण्यासाठी समर्पित विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाचा लोकप्रिय उपक्रम. त्याअंतर्गत 'गुडबाय 2024' या विषयावर एक मनोरंजक आणि माहितीपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून सुप्रसिद्ध गायिका व ज्योतिषी श्रीमती कल्पना ज्ञानेश्वर आमधरे जी उपस्थित होत्या.

संयोजक युवराज चौधरी व सहसंयोजक वैशाली मदारे यांनी स्वागत वस्त्र व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला. कल्पना जी यांनी आपल्या भाषणात ज्योतिषाचे महत्त्व सांगितले. तुमचा स्वभाव, तुमच्या आवडी-निवडी, तुम्हाला कोणत्या क्षेत्रात रस आहे, तुमचे आरोग्य याचे विश्लेषणही ज्योतिषशास्त्रात केले जाते. ज्योतिष हे काही चमत्कार किंवा जादूटोणा नाही तर ते एक असे शास्त्र आहे जे जीवनाच्या प्रत्येक पैलूची गणिती पद्धतीने माहिती देणारे माध्यम आहे.

ज्योतिषी कल्पना आमधरे जी यांनी ही कल्पना मुले आणि त्यांच्या पालकांसमोर मांडली. तसेच सुरुवातीला एक गीत गायले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक युवराज चौधरी यांनी केले.

त्यानंतर मुलांनीही आपल्या नृत्य आणि गाण्याने सर्वांची मने जिंकली. ज्यामध्ये खुशी अंबिलडुके, अनुया आचार्य, भव्य अरोरा, कोएल गेहानी, देवांशी पटनायक, राम बागल यांनी सुंदर गाणी सादर केली. विधी महालगावे आणि अवनी महालगावे यांनी शानदार नृत्य केले.

हुशार मुलांच्या सादरीकरणाला पालकांसह ज्योती महालगावे, बसंती मिश्रा, वंदना जनबंधू, सरिता लाकुडकर, वेदप्रकाश अरोरा, यशवंत गणवीर, आर.सी.महातो, दीपक भावे, मीनाक्षी केसरवाणी, हेमा गेहानी, देवस्मिता मानस पटनायक, प्रीती पाटील आदींनी दाद दिली.

# वाघदरा इसासनी येथे क्षत्रिय च्रकवती सम्राट राजा भोज चौक नामकरणचा भव्य सोहळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

क्षत्रिय पोवार राजा भोज संस्था हिंगणा व सौदामिनी ले आऊट नागरीक गण यांच्या संयुक्त विद्यमाने मान्यवरांच्या उपस्थितीत छेदनजी कटरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. आणि उद्घाटक विजय पटले युवा अध्यक्ष पवार युवक संघटन, नागपूर प्रमुख अतिथी पं.स. उपसभापती सौ.पौर्णिमाताई दिक्षित पं.स. सदस्य लिलाधरभाऊ पटले सरपंच अरविंदभाऊ ढोणे सामाजिक कार्यकर्ते सुशिलजी दिक्षित आदर्श पटले, लोकेश चव्हाण लखन ठाकरे सुरेशजी ठाकरे बबलूजी बनोठे जयसिंग पटले दादाराव मसराम, पुरुषोत्तम भगत, शशिकला ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.संचालन प्रफुल पन्धे यांनी तर नरेश अंबुले यांनी आभार मानले.




कार्यक्रमाकरीता सुभाष राठोड लक्ष्मीचंद हरीणखेडे योगेश कडवे, धर्मेंद्र ठाकरे, राजेश पांडे, तिथानंद रहांगडाले, सुरेश कटरे, लंकेश सुमुने, योगेश्वर पटले, निलेश धारपुरे, अरविंद पेटकर, नरेंद्र खाडे, आनंद आचरे, टागोर बिसेन, राकेश कडवे, ज्ञानेश्वर चौधरी, गणेश शिवणकर, संजय ठाकुर, चौधरीताई, कटरेताई, पटलेताई, पन्धेताई, हरीणखेडेताई, मैक्षामताई सौ.देशमुख गजापुरे, ब्राह्मणकर ताई, गांवडेताई, तिवारी यांनी विशेष सहयोग केला.

# उद्गीरच्या सायकल ग्रुपची स्मृतीभवनला भेट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

उदगीर सायकलिंग ग्रुपचे ४२ सायकल स्वार पर्यावरणाचा मृदा संवर्धन हा विषय घेऊन उदगीर ते अयोध्या असा जवळपास पंधराशे प्रवास सायकलद्वारे करत असून या यात्रेचा मानस मूळ उद्देश पर्यावरणाविषयी जागृती निर्माण करून पर्यावरण संवर्धन करणे व यामध्ये मृदा संवर्धन हा विषय त्यांनी मांडला. ही सायकल यात्रा नागपुरात पोहोचताच नागपुरातील टायगर ग्रुप ऑफ अ‍ॅडव्हेंचरतर्फे रेशीमबागेतील संघ कार्यालयातील स्मृतीभवनला त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. सर्व सायकल स्वारांनी डॉ. हेडगेवार यांच्या अभिवादन केले. तसेच हिवरीनगर येथील प्रशांत विद्यालयाच्या त्यांचे स्वागत केले. यावेळी टायगर ग्रुप ऑफ अ‍ॅडव्हेंचरचे रवींद्र तरारे, संजय बाटवे, श्रीधर हातागळे, प्रकाश निकम, अतुल तपासे, प्रसाद देशपांडे, संजय फरतोडे, ओमप्रकाश डोर्लीकर, अरविंद महाकाळकर, संदीप वैद्य, अविनाश भांदककर, अरविंद भंडावार, मुकुंद पांढरे, विशाल दांडेकर, मनीषा दांडेकर इतर सदस्य व प्रशांत विद्यालयाचे भूषण तल्हार, छाया गोस्वामी व विजय आसोले यांनीही त्यांचे स्वागत केले.

# श्रीनिवास पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक क्रिडा दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

श्रीनिवास पब्लिक स्कूल- श्रीनिवास पब्लिक स्कूल, सेमिनरी हिल्स येथे २१ डिसेंबरला वार्षिक क्रिडा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला होता .डब्ल्यु ई.एस.चे उपाध्यक्ष डॉ.अविनाश देशमुख, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. अविनाश देशमुख यांनी केले. वार्षिक क्रिडा उत्सवाचे अतिथी डब्ल्यु.ई.एस, सचिव डॉ. नंदा राठी, व्यवस्थापक- एस पी एस अविनाश पेंडसे डब्ल्यु. ई एस सदस्य, डॉ. हर्षा झरिया सी ए ओ, डब्ल्यु ई एस आणि प्राचार्य- प्रतिमा ढोके सर्व पाहुण्यांचे स्वागत मुख्याध्यापिका डॉ. उन्नती दातार यांनी केले. विविधतेत एकता याविषया अंतर्गत कार्यक्रमाची सुरुवात सूर संगमाने झाली. भारतीय सांस्कृतिक लोकनृत्ये मोठ्या जोमाने सादर करण्यात आली. श्रीनिवास पब्लिक स्कूल या दिवसाचे मुख्य आकर्षण म्हणजे सामूहिक योग आणि त्यानंतर 'पसायदान'चे सामूहिक गायन हे होते.



# कोल इंडिया रिटायर्ड ऑफिसर्स असोसिएशन तर्फे अमृत महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

७५ वर्षे पूर्ण झालेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांसाठी सिरोवातर्फे अमृत महोत्सवाचा रंगारंग कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी उपस्थित श्रीमती इरावती दाणी, एस.के.पुरी, व्ही.एस.कुलकर्णी, ए.के. बसाक, पी.देव,एस.के. मुखर्जी, एन.एम.गजभिये, श्रीमती तमडू, बी.एस.गौर डॉ. चोकसे, डॉ. गजेंद्र गडकर आदींचा पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार करण्यात आला. टेंभुर्णीकर व पुराणिक यांच्या पथकाने गायनाचे आयोजन केले होते. कार्यक्रमयशस्वी करण्यासाठी एस.के.पुरी, अरुण हजारे, सुधाकर चाडोकर, जयश्री सायरे, नंदा रणदिवे यांनी विशेष सहकार्य केले. मंचाचे सूत्रसंचालन जे.एस सायरे यांनी केले. अरविंद कोमवार अध्यक्ष यांनी कार्यक्रमाचे कौतुक करून सर्वांचे आभार मानले.

# कुत्र्याला वाचविण्याच्या प्रयत्नात अपघात

**नागपूर** : कुत्र्याला वाचविण्याच्या प्रयत्नात अचानक वाहनाचा तोल गेला आणि तो वाहनासह काही दूरपर्यंत फरफटत गेला. यात त्याच्या हात-पाय आणि छातीला गंभीर दुखापत झाली. मागे बसलेली पत्नीही जखमी झाली. मात्र, हेल्मेट असल्याने त्याचा जीव वाचला. ही घटना दाभा मार्गावर घडली. अखिलेश गणवीर रा. एमआयडीसी असे त्या युवकाचे नाव आहे. त्याची पत्नी अमिता ही गोंदियाला नोकरीवर आहे. अखिलेश दररोज पत्नीला रेल्वे स्थानकावर सोडून देतो. घटनेच्या वेळी तो नेहमीप्रमाणे सकाळी अमिताला सोडून देण्यासाठी मोटारसायकलने निघाला. घरापासून काही अंतरावर गेल्यानंतर खडगाव ते दाभामार्गावर रस्त्यात अचानक कुत्रा आडवा आला.

त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात अखिलेशचा तोल गेला आणि दुचाकीसह दोघेही खाली पडले. अखिलेश काही दूरपर्यंत फरफटत गेला. तो रक्तबंबाळ झाला तर अमिताच्या पायालाही दुखापत झाली. सकाळी 8 वाजताची वेळ असल्याने सुदैवाने रस्त्यावर फारसी वर्दळ नव्हती. अन्यथा मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# निःशुल्क कायदा सल्ला व मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

भारतीय जनता पार्टीतर्फे पश्चिम नागपूर, विधानसभा क्षेत्रातील गीतानगर, झिंगाबाई टाकळी परिसरात 'निःशुल्क कायदा सल्ला व मार्गदर्शन केंद्र' सुरु करण्यात येत आहे. रविवारी २९ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता माजी आमदार, सुधाकर देशमुख यांच्या हस्ते व जितेंद्र (बंटी) कुकडे, प्रविण दटके, अ‍ॅड. उदय डबले, सुधाकर कोहळे, संदीप जोशी, विनोद कन्हेरे यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन होणार आहे.

लोकांच्या कायद्याच्या अपूऱ्या ज्ञानामुळे किंवा योग्यवेळी कायदेशीर सल्ला न घेतल्यामुळे समाजात वाद-विवाद व तंटे निर्माण होतात. या वादांचा परिणाम नाहक पिढी दर पिढी भोगावा लागतो.

मात्र योग्य कायदेशीर सल्ला व मार्गदर्शनामुळे समाज शिक्षित तर होतो. आपसातील वाद-विवाद व तंटे दूर होतात. याच उद्देशाने भारतीय जनता पार्टी तर्फे निःशुल्क 'कायदा सल्ला व मार्गदर्शन केंद्र' सुरु करण्यात येत आहे. 'कायदा सल्ला व मार्गदर्शन केंद्र' सकाळी ९ ते सायंकाळी ७ वाजेपर्यत सूरू राहील.

# हर्षिता आवळेची यशस्वी कामगिरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

नागपूर जिल्ह्यातील, बोकारा येथील ग्रामपंचायतच्या माजी सदस्या, सुप्रिया आवळे यांची कन्या हर्षिता आवळे, हिने केरळ येथील नॅशनल फुटबॉल चैम्पियन ट्रॉफीमध्ये सहभाग नोंदविला होता.

तिच्या टीमने चॅम्पियन ट्रॉफी जिंकून, बोकारा गावाची ओळख आणि आपल्या खेळाचा ठसा देशपातळीवर उमटविलेला आहे. हर्षिता येथील विद्याथीर्नी असून, ९ व्या वर्गात शिकते आहे. आपल्या यशाचे सर्व श्रेय ती आपले कोच, कविंद्र महेश्वर आणि आपल्या आईवडिलांना देते.

# नागपूर पोलिस दलास जनरल चॅम्पियनशिप चषक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

पुणे येथे नुकतेच पार पडलेल्या महाराष्ट्र पोलिस कर्तव्य मेळाव्यात नागपूर पोलिस दलाने सर्वाधिक ९ पदके जिंकली. उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर जनरल चॅम्पियनशिप चषक पटकावला. महाराष्ट्रातील २३ घटकाच्या पोलिस संघांमध्ये नागपूर शहर पोलिस प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्या संघाला राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या हस्ते चषक प्रदान करण्यात आला. पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी एक लाख ६५ हजार रुपयांचे बक्षीस दिले. महाराष्ट्र पोलिस कर्तव्य मेळावा ही पोलिस दलाची एक प्रतिष्ठित स्पर्धा आहे. पोलिसांना जिल्हा किंवा राज्य स्तरावर कामकाजाच्या अनुभवांची देवाण-घेवाण तपासाच्या संदभार्तील कल्पनांवर विचारमंथन करण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध नसल्याने याच उद्देशाने महाराष्ट्र पोलिस कर्तव्य मेळावा ही संकल्पना महाराष्ट्र पोलिस दलात रुजविण्यात आली आहे. १९ वा महाराष्ट्र पोलिस कर्तव्य मेळावा पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. ही स्पर्धा एकूण ६ प्रकारामध्ये घेतली गेली. यात सायंटिफिक एड टू इन्व्हेस्टिगेशन, पोलिस फोटोग्राफी, व्हिडीओग्राफी, कम्प्युटर अवेअरनेस, अँटी-सॉबोटेज चेक आणि श्वान स्पर्धा यांचा समावेश होता. पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांच्या मार्गदर्शनात व अपर पोलिस आयुक्त संजय पाटील त्यांच्या देखरेखीत नागपूर शहर पोलिस दलातर्फे ४ अधिकारी आणि १६ अंमलदार अशी एकूण २० सदस्यांची चमू निवडण्यात आली होती.



या स्पर्धेमध्ये ठाणेदार प्रशांत ठवरे यांनी मेडिकल लीगल ओरल या प्रकारात १ सुवर्णपदक, फॉरेन्सिक सायन्स १ सुवर्णपदक, फॉरेन्सिक ए टू इन्वेस्टिगेशन (लेखी परीक्षा) १ रौप्य पदक पटकावले. तसेच पोलिस अमलदार कृणाल उके यांनी कम्प्युटर अवेअरनेस या प्रकारात १ सुवर्णपदक, कम्प्युटर अवेअरनेस (डॉट नेट) या प्रकारात १ रौप्य पदक, पोलिस अंमलदार पलाश कम्प्युटर अवेअरनेस या प्रकारात (डॉट नेट) १ रौप्य पदक, कम्प्युटर अवेअरनेस १ कांस्य पदक, तसेच महिला पोलिस अंमलदार प्रतीक्षा नागपुरे यांनी पोलिस पोर्ट्रेट या प्रकारात १ सुवर्णपदक ऑब्झर्वेशन टेस्ट या प्रकारात १ सुवर्णपदक असे एकूण सर्वांनी मिळून ९ पदके प्राप्त केले.

# भंडारा रोड ते पारडी नाका परिसरातील भाजी बाजारामुळे नागरिक त्रस्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

भंडारा रोड ते पारडी नाका परिसरातील भाजी बाजारामुळे तेथील रहिवासी त्रस्त झाले आहेत. भाजीविक्रेते रस्त्यावरच ठाण पसरून बसतात. भाजीचे असंख्य गाडेही रस्त्यावरच लागतात. अगदी रस्त्याचा निम्मा भाग ते व्यापून घेतात. त्यामुळे एचबी टावून रोड कडून भंडारा रोड कडे जाणाऱ्या रस्त्यावर सायंकाळच्या वेळी जाताना या भाजी बाजारामुळे वाहतूक ठप्प होते. चौकापर्यंत दुभाजकाच्या दोन्ही बाजूंनी रोज हा भाजी बाजार भरतो. त्यामुळे सायंकाळी वाहनचालकांची चांगलीच तारांबळ उडते. एवढेच नव्हे तर अनेकांना मोठा त्रास सहन करावा लागतो.



अनेक वसाहतींकडे जाण्यासाठी हा प्रमुख मार्ग आहे. याच रस्त्यावर रोज सायंकाळी भाजी बाजार भरतो. फळ विक्रेत, भाजी, पाणीपुरी-भेळ, विक्रेत्यांच्या गाड्या रात्री नऊपर्यंत असतात. ही संख्या वाढत असून या रस्त्यावरून चालणेही कठीण होते. दुभाजकाच्या एका बाजूने असलेल्या ४० फूट रस्त्यावरील २० फूट भाग विक्रेते व्यापून घेतात. विक्रेते आणि खरेदीदारांची गर्दी रात्री नऊ वाजेपर्यंत असते.

त्यामुळे पोलिस प्रशासनाने वारंवार सुचना दिल्या नंतर ही अरेरावी पद्धतीने भाजीपाला विक्रेते भंडारा ते पारडी रोडवरील नाल्याचा पूलावर बसून भाजीपाला विक्री करत असतात.

त्यामुळे वाहतूकही ठप्प होवून वाहतूकीची मोठ्या प्रमाणात समस्यां निर्माण झाली आहे. त्यासाठी भाजीपाला विक्रेते यांच्याशी समझोता करताना उपस्थित सामाजिक कार्यकर्ते योगेंद्रभाई चटप, हेड कॉस्टेबल निलेश शिरभाते, पोलीस कॉन्स्टेबल रविंद्र लोहारे पारडी ट्रॅपिक पोलिस भाजीपाला विक्रेत्याच्या समस्यावर तोडगा काढताना उपस्थित होते.

# १ कोटींच्यावर बदलल्या २००० दराच्या चलनी नोटा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

चलनातून गायब झालेल्या २हजार रुपये दराच्या चलनी नोटा बदलविणाऱ्या रॅकेटचा सदर पोलिसांनी भंडाफोड केला. याप्रकरणी पोलिसांनी ४ आरोपींना अटक करून २ लाख रुपये जप्त केले आहेत.

नंदलाल मोर्या (३५) रा. सीताबर्डी, रोहित बावणे (३४) रा. शांतीनगर, किशोर बोहरीया (५४) रा. झिंगाबाई टाकळी आणि अनिलकुमार जैन (५६) रा. जबलपूर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. यातील मुख्य आरोपी जैन याला न्यायालयाने पोलिस कोठडी सुनावली आहे. तर तिघांची कारागृहात रवानगी करण्यात आली. जैन याला रक्कम देणाऱ्या म्होरक्याचा पोलिस शोध घेत आहेत.

गत काही काळापासून दोन हजार रुपये दराच्या नोटा चलनातून बाहेर झाल्या आहेत. ज्यांच्याकडे या नोटा आहेत त्यांनी त्या नोटा बदलून घेण्यासाठी शासनाकडून वेळ देण्यात आला होता. त्यानंतरही अनेकांकडे त्या नोटा आहेत. विशेषतः मोठ्या व्यापाऱ्यांनी शासनाचा कर चुकविण्यासाठी त्या नोटा दाबून ठेवल्याचा संशय आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मुख्य आरोपी अनिलकुमार जैन हा व्यापारी आहे. तो दिल्ली आणि बनारसहून २ हजार दराच्या चलनी नोटा आणतो. त्या बदलण्यासाठी त्याने नागपुरातील मोर्या, बावणे आणि बहोरीया यांना हाताशी धरले. यातील बहोरीया हा विधान भवन चौकात भुईमुंगाच्या शेंगा विकतो. त्याच्याकडे रक्कम ठेवलेली असते. तो स्लम भागातील महिलांशी संपर्क साधून प्रत्येक महिलेला २० हजार रुपये बदलण्यासाठी देतो. अनेक महिला आरबीआय बँकेत येतात आणि संपूर्ण प्रक्रियेनंतर २००० दराच्या नोटेच्या बदल्यात पाचशेच्या चलनी नोटा घेतात. बदलून मिळालेली रक्कम बहोरीयाकडे जमा करतात. प्रत्येक महिलेला २० हजारावर ३०० रुपये नकदी रक्कम मिळते. तर बहोरीया याला २ हजारावर १०० रुपये मिळतात. दरम्यान सदर पोलिसांना याबाबत गुप्त माहिती मिळाली. माहितीच्या आधारावर पोलिसांनी सापळा रचून मोर्या, बावणे आणि बोहरिया या तिघांनाही पकडले. झडतीमध्ये पोलिसांना मोर्याच्या खिशातून ५०० रुपये दराच्या १२० चलनी नोटा असे एकूण 60 हजार रुपये मिळून आले. बावणे याच्या जवळ 2 हजार दराची एक नोट आणि पाचशेच्या 120 नोटा असे एकूण 62 हजार रुपये आणि बहोरीया याच्या जवळून 500 रुपये दराच्या 160 नोटा असे एकूण 80 हजार रुपये, असे एकूण 2 लाख 67 हजार रुपये मिळाले. चौकशीत या जैन याने त्यांना 2 हजार दराच्या नोटा बदलून आणण्यासाठी दिल्याची माहिती आरोपींनी दिली. पोलिसांनी जैन यालाही अटक केली. चौकशीत आतापर्यंत एक कोटीच्यावर 2 हजार दराच्या चलनी नोटा बदलविण्यात आल्याचा धक्कादायक खुलासा झाला आहे. जैन याच्याकडे या नोटा कुठून आल्याचा याचा शोध पोलिस घेत आहेत. ही कारवाई पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल, पोलिस उपायुक्त राहुल मदने यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक मनीष ठाकरे, नितीन विटोले, उपनिरीक्षक नीलेश घोगरे, मिलिंद भगत, सतीश गोहत्रे, अमोल दौंदलकर, अशीष बहाळ, सचिन कावळे, पंकज तिवारी आणि बालाजी गुट्टे यांनी केली.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **SUSHIL KUMAR MISAL.** NOW MY NEW NAME IS **SUSHIL SHALIGRAM MISAL.**
**ADD** : PLOT NO 145, SHILPA SOCIETY MANISH NAGAR NAGPUR 440015.

MY OLD NAME WAS **FAIZ AHMED AHMED HASAN / FAIZ AHMAD / FAIZ AHMED AHMED HASAN SAYYED.** NOW MY NEW NAME IS **FAIZ AHMED SAYYED.**
**ADD** : PLOT NO 30A, RATHOD LAYOUT, ANANT NAGAR, NAGPUR 440013.

MYSELF **FAIZ AHMED SAYYED** WANTED TO CORRECT MY SONS NAME FROM **MOHAMMED MURSALEEN** TO **MOHAMMAD MURSALEEN SAYYED.**
**ADD** : PLOT NO 30A, RATHOD LAYOUT, ANANT NAGAR, NAGPUR 440013

MYSELF **FAIZ AHMED SAYYED** WANTED TO CORRECT MY DAUGHTERS NAME FROM **AYESHA** TO **AYESHA SAYYED.**
**ADD** : PLOT NO 30A, RATHOD LAYOUT, ANANT NAGAR, NAGPUR 440013

# दाऊदपेक्षाही वाल्मिक कराड 'डेंजर' आहे?

**ज्या संशयित गुन्हेगाराचे नाव घेण्यासही राजकीय नेते कचरत आहे, असा वाल्मीक कराड हा दाऊद इब्राहिम पेक्षा खतरनाक आहे का? अशी जनतेमध्ये आता चर्चा सुरू झाली आहे. 'बीडचा बिहार झाला' असं म्हटले तर अनेकांना वाईट वाटते. बीडची आणि बिहारची तुलना करू नका, असे स्थानिक राजकीय नेते सांगू लागले आहेत. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर हल्ला करताना 'बीडचे पर्यटन स्थळ करू नका' असे सांगितले आहे. पण आता तर बीडमुळेच बिहार बदनाम होतोय, असेच वाटू लागले आहे. कारण सामान्य नागरीकांचे मुडदे तर पडतच आहे, पण सनदी अधिकारीही कायमचे गायब होत आहे. विरोधात गेला, तो संपला हा तेथील कायदा झाला आहे व त्याला स्थानिक राजकीय नेते जबाबदार असल्याचे स्पष्ट होवू लागले आहे. बीडमध्ये शोले चित्रपटातील 'गब्बर' प्रमाणे 'बेटा सो जा नही तो वाल्मीक आ जायेगा' अशी स्थिती निर्माण झाली आहे. जर वाल्मीक कराड इतका खतरनाक असेल, तर तो नक्कीच दाऊद इब्राहिम पेक्षाही उजवा ठरू शकतो. पण दाऊद भारतात बॉम्बस्फोट करून अनेक निरपराध नागरिकांना मारून पाकिस्तानात जाऊन लपला आहे. मग वाल्मीक कराड एवढे मोठे गुन्हे करून कोणत्या राजकीय नेत्याच्या 'पाकिस्ताना'त जाऊन लपला आहे? हे शोधायची गरज आहे. परंतु बीडमध्ये ती बाब मात्र अशक्य दिसत आहे. एक वेळ चंबळच्या खोऱ्यातील खतरनाक दरोडेखोर पकडून आणले जातील. पण बीडमध्ये ज्यांचे राज्य आहे, त्यांच्या साम्राज्याला धक्का लावणे 'लाडक्या बहिणीं'च्या लाडक्या 'देवाभाऊ'ला देखील शक्य नाही!**



एका बाजूला हिंदुत्वाच्या गप्पा मारायच्या व दुस-या बाजूला हिंदूंचेच मुडदे पाडायचे ही कोणती रीत? उदाहरणच द्यायचे झाल्यास सांगता येईल की, मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हे नमिता मुंदडा यांचे विधानसभेला बुथप्रमुख होते. म्हणजे ते हिंदुत्वाच्या बाजूनेच होते. परंतु एकाही हिंदुत्ववाद्याने साधी श्रद्धांजलीची पोस्ट केली नाही, साधी कमेंटही नाही. बांगलादेशातील हिंदूवर मात्र सारेच बोलतात. इथं एका हिंदुत्वासाठी लढणाऱ्या सरपंचाचा अतिशय निघृण खुन केला जातो. मारून मारून जीव जाताना पाणी मागितले, तर खुनी तोंडांत मुतलेत. छातीवर उड्या मारल्याने बरगड्या मोडून हृदयात घुसल्या. त्या सरपंचाच शरीर ठीकठीकाणी जाळण्यात आलं. डोळे जाळण्यात आले.

हिंदुत्वासाठी लढणारा व १९ पुरस्कार गावाला मिळवून देणारा सरपंच दिवसाढवळ्या मारला गेला. मुख्यमंत्र्यांनी नेमलेली एसआयटी काय कामाची हे सर्वांना माहीत आहे. मग कशासाठी हिंदुत्व पुढे केले जाते? खंडणीचा पैसा गोळा करण्यासाठी राजकीय छत्र मिळावे म्हणून राजकारणात आलेले नेते हे सर्वांनाच ज्ञात आहे. परंतु खंडणी गोळा करतांना कुणी आड आले तर हींस्त्र पशुलाही लाजवेल असे क्रुर व हिंस्त्र कृत्य आपल्या हस्तकाला आदेश देवून करून घ्यायचे व हे क्रुर कृत्य हस्तकाकरवी होत असतांना आदेशानुसार अंमलबजावणीची खातरजमा होण्यासाठी लाईव्ह व्हिडीयो पहात बसणे, यासारखे हिंस्त्र व क्रुर मानसिकतेचे नेते राजकारणात वरीष्ठ मंत्रीपदावर आरुढ होवुन बिनदिक्कतपणे मानवी देहाची विटंबना व अमानुष छळ करतानाचे द्रृष्य व्हिडिओ कॉलवर बघत खात्री करतात, यासारखे मानवजातीला काळीमा फासणारे नेते आजही राजरोस सार्वजनिक जीवनात उघड्या छातीने फिरतात, यासारखे लोकशाहीचे दुर्दैव दुसरे काय? लोकशाहीच्या नावाखाली ठोकशाही राजरोस सुरू आहे.

एवढे होऊनही गुन्हेगारांच्या हातात हात घेऊन राजकारण करणारे, अजुनही गेंड्याची कातडी पांघरूण शांत बसलेले आहेत. अजुनही मुख्य सुत्रधारांची धरपकड व कारवाई नाही.



जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

यातच सगळे काही आले. काही दिवसांनी जनता विसरेल आणि कारवाई वासणात गुंडाळली जाईल व परत जैसे थे होत क्रुरकर्माची हिंमत वाढुन ते अजून बिनदिक्कतपणे खंडणी व त्यातुन राजरोस खुन करतील. राजाश्रय असल्याने सर्व काही जैसे थे होईल. खरे पाहता पोलीस यंत्रणा ही सामान्यांना न्याय देण्यासाठी नाही, तर खंडणी बहाद्दर नेत्यांच्या वळचणीला बसुन त्यांच्या खंडणी उद्योगाला व त्यातील खंडणी वसुली करणा-या बहाद्दरांना संरक्षण देण्यासाठी आहे. अन्यथा त्यांचीही मलीदा असलेल्या ठिकाणची नेमणूक रद्द होईल आणि त्यांच्यावर बदली, विभागीय चौकशी, बडतर्फी सारखी कारवाई ठरलेलीच आहे.

पोलीस, प्रशासन, नेते सर्वच जण 'पैशासाठी काहीपण' ही मानसिकता घेवूनच पेशामधे प्रविष्ट झालेले आहेत. पैशाच्या लोभापायी क्लासेसची मोठमोठाली फी भरुन अहोरात्र अभ्यास करत शासन प्रशासनात दाखल झालेले अधिकारी आर्थिक गैरव्यवहाराची एकही संधी सोडत नाहीत. कुणीही अधिकारी प्रामाणिक देशसेवेसाठी येत नाही. आमदार, मंत्री जनतेच्या सेवेचे पांघरुण घेऊन आतमधे नोटा मोजत आहेत. कुणालाही देशाचे किंवा जनतेच्या भल्याचे पडलेले नाही. आज महाराष्ट्रातील निवडणुकीत किती गुन्हेगार निवडून दिलेत, मतदाराला उमेदवाराची गुन्हेगारी पार्श्वभुमी माहीत असतानाही त्यांना मतदारांनी निवडून आमदारपदी बसवले आहे. शेवटी अशा उमेदवारांचा उन्मत्तपणा वाढुन त्याचा उन्माद जनतेला भोगावाच लागतो. घाणेरडे किळसवाणे, गेंड्याच्या कातडीचे क्रुर नेते राजकारणात शिरकाव करत हैदोस घालत आहेत. राजकीय संरक्षण असल्याने पोलीस व प्रशासन मांडीखाली दाबुन राजरोस मोगलाई सुरु आहे. यांनी केलेले शेकडो खुनाचे प्रकरण बाहेरच येत नाहीत.

गुन्हेगारीतुन राजकारणात शिरकाव केलेले जनतेला काय न्याय देणार? राजकारणाची पहीली पायरी गुन्हेगारी असेल तर अशा राजकीय नेत्यांकडून न्यायाची काय अपेक्षा करणार ? दिवसेंदिवस महाराष्ट्रातील राजकारण अतिशय खुनशी क्रुर व किळसवाणे होत आहे. सगळीकडे राजकारण्यांची बेबंदशाही हिंसाचार खंडणी व लुटमार सुरु आहे. जनतेला मात्र कुणीच वाली नाही. सत्तेतील व विरोधातील सर्व पक्षांतील नेत्यांना खुनाचा तपशील, त्यामागील बडे नेते याबद्दल खुलासेवार माहीत आहे. पण उगीच पोलिस चौकशी होईल, सीआयडी, एसआयटी नेमणूक वैगरे आळमटळम चालू आहे. एका बाजुचे लोक चौकशी करा, न्याय द्यायची नौटंकी करतात. तर दुस-या बाजूला सत्तेतील नेते चौकशी होईल, कमीटी बसेल, न्याय मिळेल असे थातुरमातुर भाष्य करत वेळ मारुन नेत आहेत. यामागील खरे सुत्रधार सगळ्यांना माहीत आहे. पण त्याचे नाव न घेता, हस्तकांना पुढे करत वेळ काढत आहेत. कारण सगळ्याच नेत्यांचे थोडेफार काळ्या कृत्यात हात अडकले असल्याने जनतेच्या समाधानासाठी कौशल्यपुर्ण भाषणांची नौटंकी सगळेच नेते करत आहेत आणि जनतेची भुलवण करत त्यांच्या असंतोषाला फुंकर घालत त्यांचे कनवाळू बनण्याची चढाओढ सगळीकडे चालली आहे. वास्तविक सगळे काही उघड असतांना उगीचच राजकीय भांडवल करत आपापले राजकीय स्वार्थ साधण्याची कसरत सुरू आहे. एक राजकीय नेता गुन्हा करतो, दुसरा राजकीय विरोधक जनतेची बाजु घेत त्यांना उगी उगी करत न्याय देण्याचा आव आणतो. सगळेच नौटंकी करताना दिसत आहेत.

गोष्ट साधी आहे पोलीसांनी आणि राजकारण्यांनी खरेच मनापासून मनावर घेतले, तर अपराधी क्षणात जेरबंद होतील. पण तसे न करता विधानसभा व परिषदेचा वेळ प्रॉडक्टीव्ह कार्यासाठी खर्च न करता, जनतेची दिशाभूल करत साध्या विषयावर वेळ मारुन नेत आहेत. महाराष्ट्राचा पोरखेळ मांडला आहे सर्वांनी मिळुन. मीडिया व राजकारणी सर्वच आपली व्यावसायिक पोळी भाजून घेत आहेत. सर्वच नेते गुन्हेगारीत मग्न असल्याने सत्तेच्या लालसेने ऐकमेकांवर ताशेरे ओढण्याची नौटंकी करत आहेत. ख-या अर्थाने न्याय व जनतेचा पाठीराखा कुणीच नाही. ऐकमेकांवर कुरघोडी आणि त्याची सार्वजनिक नौटंकी यातच नेत्यांचे राजकीय आयुष्य फळत फुलत आहेत. त्यामुळे महाराष्ट्राची प्रगती दिवसेंदिवस रसातळाला चालली आहे. हे सगळे 'राजकारणी' नसुन 'घाणकारणी' आहेत. कुणीही विश्वास ठेवण्यालायक नाही. गुन्हेगारांचे बाप आहेत हे सगळेच.

भोळी जनता कधी ह्या नेत्याकडे, तर कधी त्या नेत्यांकडून न्याय मिळेल ह्या भोळ्या, अज्ञानी, मुर्ख आशेने त्यांना फॉलो करतात. त्यांच्या स्तुतीची कॉमेंट करतात आणि हे नेते कॉमेंट ऐकून एकमेकांना टाळ्या देतात. निव्वळ करमणूक म्हणून राजकारण आणि पैसा वसुली एवढेच राजकारणी करत आहेत. कुणाला आदर्श म्हणावे असा राजकीय नेता व शासनातील, पोलीस प्रशासनातील अधिकारी दिसायलाच तयार नाही. गुन्हेगारीवर पांघरूण घालण्यासाठी, कार्यकर्त्यांचे गुन्हे लपवण्यासाठी, स्पर्धा करणा-यांवर वचक बसवण्यासाठी व त्यातुन त्यातुन भविष्यातील सत्ता वाढवण्यासाठी आणि त्यासाठी लागणारे अर्थाजन प्राप्तीसाठी गृह व अर्थ खात्यासाठी अडुन बसल्याचे चित्र महाराष्ट्र पाहतोय. मंत्रीपद मिळवताना न्याय व सुव्यवस्थेसाठी, जनतेच्या सेवेसाठी मंत्रीपद मागतोय हे फक्त जनतेला भुलवण्यासाठी दिशाभूल करण्यासाठी आहे.

प्रत्यक्षात फक्त मलीदा खाण्यासाठी विशिष्ट मंत्रीपदाचा हट्ट असतो. त्यासाठी कार्यकर्त्यांच्या मेळाव्यातून दबावतंत्र, तर कुणी सरकारचे कौशल्यपुर्ण मतलबी भाषणातुन वाभाडे काढुन, तर कुणी जनतेला न्यायासाठी रस्त्यावर उतरवतोय, कुणी शेतक-यांच्या शेतमालाच्या भावासाठी शेतक-यांची पाठराखण करतो, कुणी आरक्षण घेउन बसलेत, सगळी अर्थाजनाची आणि त्यासाठी सत्तेची नौटंकी करत बसले आहेत. जनता मात्र न्यायासाठी तोंड आ करून आशेने बघत बघतात व सत्ताधीश बेमालूमपणे भरमसाठ टॅक्सचा बोळा त्यांच्या तोंडात कोंबतात. न्याय तर राहीलाच बाजुला अन्यायाचा बोळा त्यांच्या तोंडात कोंबला जातो. सुन्न करून सोडणारे गजब खेळ आहेत सगळेच.

### तपास यंत्रणांची विश्वासार्हता संपल्यातच जमा

महाराष्ट्रातल्या तत्कालीन विरोधात असलेल्या नेत्याला आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी २०१६ मध्ये अटक



झाली. कालांतराने त्यांना जामीन मिळाला. नंतर त्यांनी आणि त्यांच्या पक्षाने महाशक्तीसोबत हातमिळवणी केली. गंमत पुढे अशी घडली की, सप्टेंबर २०२३ मध्ये जेव्हा सुनावणीसाठी कोर्टासमोर केस आली तेव्हा 'ईडी'ने कोर्टाला सांगितलेलं उत्तर अतिशय विनोदी आहे. याचिका कशासाठी दाखल केलेली होती हे आठवत नाही आणि याचिकेची प्रत आमच्याकड नाही. यावरून लक्षात घेतले पाहीजे की, अतिशय संवेदनशील प्रकरणात ज्यामध्ये एक माजी उपमुख्यमंत्री अटकेत होता, त्या प्रकरणाबद्दल अशी उत्तरे मिळू लागली तर जनता कोणावर विश्वास ठेवेल? आणखी गंमत तर पुढे आहे. कोर्टापुढे याचिका सुनावणीसाठी आली याचा अर्थ कोर्टाच्या दप्तरात ती फाईल आहे. कोर्टाने तारीख दिली, म्हणजेच कोर्टाने प्रकरण समजून घेतलेलं आहे. मग 'ईडी'कडे याचिका नसेल तर कोर्टाने तातडीने सगळी फाईल एक प्रत करून 'ईडी'ला द्यायची आणि चालवा खटला म्हणायचं. पण त्यापैकी हे काहीही झालं नाही. थोडक्यात राजकीय नेत्यांना धाक दाखवण्यासाठी सगळ्याच यंत्रणा आणि सगळे खांब महाशक्तीच्या दावणीला बांधलेले आहेत. संसदेच्या चालू अधिवेशनात अर्थराज्यमंत्र्यांनी दिलेली आकडेवारी आणि कबुली धक्कादायक असली तरी अनपेक्षित नक्कीच नाहीये. २०१९ ते २०२४ या पाच वर्षांच्या काळात आर्थिक गैरव्यवहाराचे एकूण ९११ खटले दाखल झाले. पैकी फक्त ४२ सिद्ध झाले म्हणजे सक्सेस रेट फक्त ४.२ टक्के. चालू असणारे खटले २५७ असून त्यामध्ये सुद्धा अशा याचिका गहाळ होत असतील तर प्रश्नच संपला. उरलेल्या खटल्यात काहीही हालचाल नाहीये. कितीतरी राजकीय नेत्यांचे करीयर बरबाद झाले असतील, कितीतरी उद्योगपती बाजारात बदनाम झाले असतील, पण कुणाला कसलीच फिकीर नाही. वरून तपास यंत्रणा, कोर्ट निष्पक्ष आहेत अशा फुशारक्या मारल्या जातात. नुसता चिखल झालाय देशातील राजकारणाचा!

# वन क्षेत्रात घट म्हणजे पर्जन्यमान कमी, प्रदुषण आणि तापमानात वाढ !

साधारणपणे जंगलाची विभागणी ही ४ भागात केली जाते.नुकतीच वन सर्वेक्षण विभागाने सन २०२३ ची आकडेवारी भारतातील वनांचे प्रमाण आणि स्थिती जाहीर केलेली आहे. याबाबतची माहिती पाहू...

झुडपी जंगल – यात जंगली झुडपांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असते.मोठी झाडे पहायला मिळत नसल्याने वनखात्याला यापासून जास्त प्रमाणात रेव्हेन्यू मिळत नसावा असे वाटते.सन २०२१ मध्ये ४४.०६ वर्ग किमी जमिनीचे क्षेत्र झुडपी जंगलाने व्यापले होते.यात घट होवून सन २०२३ मध्ये हे क्षेत्र ४३.६७ वर्ग किमी राहिलेले आहे.हे जंगल ०.३९वर्ग किमी ने कमी झाले आहे.खरे तर या क्षेत्रातून जनावरांसाठी चारा निर्मिती होने गरजेचे आहे. जनावरांना जंगलात चारा बंदी केल्याने खेडे विभागातील लोकांचा दुध उत्पादन व बकरी पालन व्यवसाय धोक्यात आला आहे.दैनंदिन रोजीरोटीचा,जोड व्यवसायाचा प्रश्न गंभीर बनलेला आहे.यासाठी त्यांना जनावरांसाठी चराई क्षेत्र उपलब्ध करून देण्यात यावे.यामुळे वनखात्याला चांगले उत्पन्न लाभू शकते.याबाबत राज्य सरकार गंभीर वाटत नाही.

घनदाट जंगल - विदर्भातील चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हा घनदाट जंगलासाठी प्रसिद्ध आहे.चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा – अंधारी व्याघ्र प्रकल्प वाघांच्या सहवासासाठी जगप्रसिद्ध आहे. यामुळे मानव व वन्यजीव संघर्षात वाढ झालेली दिसून येते आहे.वाघांच्या वाढीव संख्येने जवळपासाच्या वन्य क्षेत्रातील शेतकऱ्यांचे जगणे कठीण झाले आहे.अनेक शेतकरी व मजुरांना आपल्या प्राणांस मुकावे लागते आहे.दिवसेंदिवस यात भरच पडते आहे.यामुळे दिवसा व रात्री शेत पिकांचे रक्षण करणे कठीण जात आहे.चितळ,रान डुक्कर,रानगवा,अस्वल इ.वन्य प्राण्यांमुळे शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते आहे.राज्य सरकारचे याकडे दुर्लक्ष झाले आहे.सन २०२१ मध्ये घनदाट जंगलाचे क्षेत्र १३२०.८९ वर्ग किमी होते.ते सन २०२३ मध्ये १३१८.८७ वर्ग किमी राहिलेले आहे.यात २.०२ किमी क्षेत्राची घट झालेली आहे.ही देशासाठी भुषणावह बाब ठरू शकत नाही.

मध्यम घनदाट जंगल – घनदाट जंगलाच्या क्षेत्रात कमी आल्याने यातून मध्यम घनदाट जंगल अस्तित्वात आले आहे.यासाठी खुद्द वनखाते आणि जंगल तोड करून शेती करणारे बेजबाबदार लोक कारणीभूत ठरतात आहेत.त्यांचेवर कुठलिही कठोर कारवाई होत नसल्याने त्यांचे बळ वाढतेच आहे.जंगलातील वृक्षांची बेसुमारपणे अवैधरीत्या होणारी कटाई आणि नाल्यातील रेतीची तस्करी यापासून जंगले सुरक्षित राहिलेली नाहीत.सन २०२१ मध्ये १५५५.३९ वर्ग किमी मध्यम घनदाट जंगलाचे क्षेत्र पहायला मिळत होते.सन २०२३ मध्ये ते १५२१.६० वर्ग किमी एवढेच राहिलेले पहायला मिळते आहे.हे जंगल क्षेत्र ३३.७९ वर्ग किमी ने कमी झालेले आहे.ही अत्यंत गंभीर बाब ठरते आहे.

उघडे वन – या प्रकारच्या जंगलात वन आश्चादीत जमिनीवरील वनांचे अस्तित्व हे नष्ट झालेले पहायला मिळते आहे.या वनजमिनीवर लोकांनी अतिक्रमण करून स्वतःची शेती करणे सुरू केलेले आहे.यांस जबरानज्योत (जबरीने, नियमबाह्य पद्धतीने जमीन ताब्यात घेऊन ती वाहने )असे संबोधले जाते. अतिदुर्गम भागात हे चित्र प्रामुख्याने पहायला मिळते आहे.याअंतर्गत सन २०२१ मध्ये ११७३.९९ वर्ग किमी जमीन अस्तित्वात होती.ती सन २०२३ मध्ये ११८९.१८ वर्ग किमी झालेली आहे.यात १५.१९ वर्ग किमी ची वाढ झालेली दिसून येते आहे.वनक्षेत्रात झालेली घट ही वनक्षेत्रावरील अतिक्रमणाची नांदी ठरते आहे.जंगल क्षेत्राला लागून असलेले लोक वनांची अवैधरीत्या कटाई करून आपली उपजीविका भागवीत असतात.यामुळे वन कायदे सक्त असूनही वनांच्या क्षेत्रात दिवसेंदिवस घट होतांना पहायला मिळते आहे.यामुळे जागतिक पातळीवरील पर्यावरणांस सुध्दा धोका निर्माण झाला आहे.

जंगल नष्ट करून औद्योगिक क्षेत्रात झालेल्या वाढीमुळे तापमानात वाढ होऊन पर्जन्यमानात घट झालेली पहायला मिळते आहे.तर दुसरीकडे नैसर्गिक पर्यावरण यामुळे बाधीत झाले आहे.पावसांच्या दिवसात पाऊस पडत नाही. ढगफुटीच्या प्रमाणात वाढ झालेली आहे.थंडीच्या दिवसात थंडी जाणवत नसल्याने याचा वाईट परिणाम पिक उत्पादनांवर झालेला आहे.पावसाचे प्रमाण कमी झाल्याने जमिनीतील पाण्याची पातळी दिवसेंदिवस कमी होते आहे.पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते आहे.अती गर्मीमुळे,उन्हाचा कडाका वाढल्याने एसीचा वापर वाढलेला आहे. यामुळे वातावरणातील ओझोनचे अस्तित्व धोक्यात आले आहे.कारखाण्याच्या चिमणीतून निघणा–या धुरामुळे वातावरणातील कार्बनडायॉक्साईडच्या प्रमाणात वाढ झाली आहे.याचा परिणाम मानवी श्वसन संस्थेवर होतो आहे.तरूणाईमध्ये हार्ट अटॅक (हृदयरोग) चे प्रमाण वाढते आहे.गावांमध्ये, शहरांमध्ये शुध्द हवा मिळणे कठीण काम होते आहे.नवल या गोष्टीचे वाटते आहे की महाराष्ट्रात ३३ करोड वृक्षांची लागवड करूनही वन क्षेत्रात वाढ झालेली दिसून येत नाही आहे.वृक्षलागवडीत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे.हे कबूल करण्यास कुणीही धजावत नाहीत.यावर मात करण्यासाठी वनखात्याने योग्य ते पाऊल उचलले पाहिजे.निव्वळ 'झाडे लावा, झाडे जगवा' घोषणा देऊन हे काम भागणार नाही.तर लोकांमध्ये जनजागृती करून अवैधरीत्या होणारी वनकटाई ही थांबवली गेली पाहिजे.रस्ते विकासाच्या नावाखाली होणारी वृक्षतोड थांबवली गेली पाहिजे.लहान – मोठ्या झाडांचे स्थानांतरण नविन प्रणालीचा, तंत्रज्ञानाचा वापर करून योग्य ठिकाणी केले गेले पाहिजे. वनांच्या क्षेत्रात वनाचे क्षेत्र कमी होने ही अभिमानास्पद बाब ठरू शकत नाही.वनांची योग्य ती काळजी घेणे हे राज्य सरकारचेच काम आहे. याला जनतेची साथ मिळणे तेवढेच गरजेचे आहे.


**मिलिंद गड्डमवार**
**तह. राजुरा जिल्हा चंद्रपूर**
**सामाजिक कार्यकर्ते व मुक्त पत्रकार**
**मो.क्र. ९५११२१५२००**

# नववर्षाचा संकल्प

ॐ सर्वे भवन्तु सुखिनः। सर्वे सन्तु निरामयाः। सर्वे भद्राणि पश्यन्तु। मा कश्चित् दुःख भाग्भवेत

'सगळे सुखी होवोत, सगळे रोगमुक्त राहोत, सगळे चांगल्या आणि मंगल घटनांचे साक्षिदार बनोत आणि कोणाच्याच वाट्याला दुःख न येवो' असा हा या चार ओळींचा भावार्थ आपल्या प्रत्येकाला व्यापक होण्याची आणि सर्वांचे हित चिंतण्याची महान शिकवण देतो. नववर्षाचे स्वागत करताना भूतकाळातील सर्व हेवेदावे विसरून सर्वांनी हा संकल्प करायला हवा ! सामूहिक प्रार्थनेत आणि सामूहिक उपासनेत प्रचंड बळ असते. 'संघ शक्ती कलौयुगे' हा कलियुगाचा मंत्र आहे याचा अर्थ कलियुगात संघटनेतच सामर्थ्य आहे. जेव्हा एखादी प्रार्थना एकत्रितपणे समूहाने केली जाते तेव्हा त्यामध्ये संकल्पशक्ती निर्माण होते. अशी प्रार्थना फलद्रुप होण्याची शक्यता अधिक असते. सामूहिक प्रार्थनेने वातावरणात सकारात्मक स्पंदने निर्माण होतात आणि मनाला त्यातून सकारात्मक ऊर्जा मिळते. सामूहिक प्रार्थनेचे महत्व आपल्याला शालेय जीवनापासून शिकवले जाते. शाळा भरण्याच्या आरंभी विद्यार्थ्यांकडून सामूहिक प्रार्थना करवून घेतली जाते जेणेकरून निर्माण होणाऱ्या सकारात्मक ऊर्जेने विद्यार्थ्यांच्या बुद्धीवरील आवरण नष्ट होऊन शालेय अभ्यासात त्यांचे मन लागावे. अनेक संप्रदाय, संघटना आणि संस्थांमध्येही सामूहिक उपासनेचे महत्व बिंबवले जाते, इतरांकडून ती करवून घेतली जाते. एकट्याने प्रार्थना करणे आणि तीच प्रार्थना सामूहिकपणे करणे यातील परिणामकारकता भिन्न असू शकते. आपण जेव्हा एकट्याने प्रार्थना करतो तेव्हा मनातील विविध विचारांमुळे आपले मन भरकटून अन्यत्र जाऊ शकते. सामूहिक प्रार्थना करताना आजूबाजूला सर्वजण तीच प्रार्थना करत असल्याने आपले मन एकाग्र होण्यास साहाय्य होते त्यामुळे ती मनापासून होते परिणामी तिची परिणामकारकताही वाढते. कुतूहल म्हणून हा प्रयोग आपणही करून पाहू शकतो. एकट्याने आणि संघटितपणे प्रार्थना केल्यावर मनावर त्याचे काय पडसाद उमटतात हे आपण स्वतःही अनुभवू शकतो. देवाचीही आरतीही आपण एकत्रितपणे करतो त्यामुळे ती अधिक सात्विक होते. राष्ट्रगीत, देशाप्रतीची प्रतिज्ञाही आपण सामूहिकपणे घेतो. त्यामुळे यंदा नववर्षाच्या आरंभी सर्वांच्या कल्याणाकरिता सामूहिक प्रार्थना करूया !

संघटनेत बळ असते, त्यामुळे पशुपक्षी समूहाने राहतात. समूहाने वावरणाऱ्या पशु पक्ष्यांवर हिंस्त्र प्राणी हल्ला करताना विचार करतात. संघटनशक्तीचे महत्व बिंबवणारी काठीची आणि काठ्यांच्या मोळीची गोष्ट आपल्या लहानपणी आपण सर्वांनीच ऐकली असेल. संघटनेत सुरक्षा असते. देशातील जाती–पातीत विखुरलेल्या समाजाचा लाभ घेऊन मूठभर इंग्रजांनी आपल्यावर दीडशेहून अधिक वर्षे राज्य केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेचा संकल्प केल्यावर सर्वप्रथम विखुरला गेलेला मराठा आणि हिंदू समाज एका विचाराखाली एकत्र आणण्यास सुरुवात केली. आदिलशहा, मुघल बादशहा आदींच्या दरबारात चाकरी करणाऱ्या शूरवीर मराठा योध्यांचे प्रबोधन करून त्यांना स्वराज्यात सामील करून घेतले. आज पुन्हा हिंदू समाज जाती–पातींच्या आणि पक्षांच्या विभागणीत विखुरला गेला आहे. राजकीय मंडळी आपल्या राजकीय स्वार्थासाठी समाजात जाती–पातीचे विष पेरत आहेत. धर्मनिरपेक्षतेचे नको तेव्हढे अवडंबर माजवले जात आहे. त्यामुळे आज कोणीही उठतो आणि हिंदूच्या देवतांविषयी, सण–उत्सवांविषयी, प्रथा परंपरांविषयी नको ते बोलतो, अवतारांना आणि धर्मग्रंथांना काल्पनिक म्हणून हिणवतो, हिंदूंच्या प्रथा परंपरांना अंधश्रद्धेचे लेबल चिकटवून हिंदूंना डिवचण्याचा प्रयत्न केला जातो. हिंदूंची मंदिरे फोडणाऱ्या, तलवारीच्या धाकावर हिंदूंचे धर्मांतर करणाऱ्या आणि हिंदूंच्या बायाबापड्यांना नासवणाऱ्या आक्रमकांचा जाहीरपणे उदोउदो केला जातो. हिंदूंना देवतास्वरूप असणाऱ्या गोमातेच्या प्रतिदिन सर्रासपणे कत्तली केल्या जातात, हिंदूंच्या उत्सवांवर, मिरवणुकांवर बंधने आणली जातात. देशात ८० टक्के हिंदू असूनही आज हिंदूंची ही अवस्था आहे. ही स्थिती बदलण्यासाठी हिंदूंनी आज जाती–पातीची आणि पक्षांची बंधने झुगारून संघटित होणे नितांत गरजेचे आहे. हिंदू सहिष्णू आहे. विश्वबंधुत्वाची भावना त्याच्या रक्तातच आहे, त्यामळे संख्येने बहुसंख्य असूनही देशातील पंथनिरपेक्षता टिकून आहे. आज देशात सर्व जातीधर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत. आदर्श राज्य म्हणून आजही जगात ;रामराज्या'ची उपमा दिली जाते. संत ज्ञानेश्वर महाराज पसायदानातून विश्वाच्या कल्याणाचे देणे भगवंताकडे मागतात. या भारतभूमीत होऊन गेलेला सर्वच संत महात्म्यांनी आपल्या अभंगांतून आणि लिखाणातून भगवंताकडे विश्वाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली आहे. विश्वकल्याणासाठी विविध यज्ञयाग आणि होमहवन करण्याची संकल्पना हिंदू धर्माच्या शिकवणुकीचाच भाग आहे. याच व्यापक शिकवणीतून आज विश्वाच्या कल्याणासाठी, विश्वातील दारिद्र्य, दुःख, निराशा नष्ट होऊन प्रत्येक जण सुखी समाधानी आणि सज्जन होण्यासाठी भगवंताकडे प्रार्थना करूया !



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई**
**मो.क्र. ९६६४५५९७८०**

## अशोकायन...

### रामराम घ्यावा २०२४

सरत्या वर्षात –
काय कमवलं काय गमवलं
याचा घ्यावा आढावा
स्वप्नपुर्तीचा संकल्प करूनी
अविरत प्रयत्न करावा ..
प्रयत्नांती परमेश्वर
हे सुत्र ठेवा ध्यानी
आज नाही तर उद्या
यश मिळेल हे ठसवा मनी



**प्रा.अशोक सारडा मेहकर**
**(९४२२३९४३३९)**

# विदर्भस्तरीय मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. २९ :

कळमेश्वर येथे रविवार दि 29 डिसेंबरला आयोजित विदर्भ स्तरीय मॅरेथॉन स्पर्धेत खुल्या पुरुष व महिला गटामध्ये पुरुष विभागात नागपूर येथील राजन यादव व महिला विभागात रिया धोत्रे यांनी अव्वल स्थान पटकावले. लीलाधर बावणे अंजली मडावी यांनी अनुक्रमे आपापल्या गटात दुसऱ्या स्थानी राहिले अजित बेंडे व प्राची गोडबोले यांना आप आपल्या गटात अनुक्रमे तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. सातपुडा क्रीडा व सांस्कृतिक मंडळ कळमेश्वर च्या वतीने आज दिनांक 29 डिसेंबरल सकाळी साडेसात वाजता विदर्भ स्तरीय मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



या स्पर्धेमध्ये विदभार्तील नामवंत खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता स्पधेर्ची सुरुवात क्रीडा संकुल ब्राह्मणी सावनेर बायपास रोड कळमेश्वर येथून करण्यात आली. या स्पधेर्ची सुरुवात. जे एस डब्ल्यू कंपनीचे महाव्यवस्थापक राजेश जैन व सातपुडा क्रीडा सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष डॉ संजय घोडखांदे डॉ राजीव पोतदार यांनी हिरवा झेंडा दाखवून केली. याप्रसंगी उपस्थित पाहुण्यांमध्ये झीम लेबोरेटरीज कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर नीरज धाडीवाल, मॅनेजर रंजन समजदार, मोहन सौदागर, योगेश पानसर, जेएसडब्ल्यू कंपनीचे मॅनेजर शाश्वत कौशिक, दिलीप गजभिये, कळमेश्वर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मनोज काळबांडे, आंतरराष्ट्रीय धावपटू प्रवीण पाटील, मंडळाचे सचिव प्रमोद कोल्हे, उपाध्यक्ष सुरेंद्र गोरडे, डॉ. घनश्याम मक्कासरे, रमनिक लाल चव्हाण, गणेश शिरभाते, डॉ. हेमंत निमजे, महादेव इखार, प्रकाश वरुळकर, सुरेश पांडे, डॉ. यशवंत पाटील, प्रवीण लामखडे, शिवाजी गौरखेडे, नरेंद्र रत्नापुरे, मुकेश सिंग व अन्य मान्यवर उपस्थित होते. ही स्पर्धा 6 गटांमध्ये विभागल्या गेली होती प्रत्येक गटामध्ये 10 बक्षिसे याप्रमाणे 60 विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते. रोख रक्कम प्रशस्ती पत्राचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये एकूण. 1 लाख 25 हजार रुपयाचे रोख बक्षिसाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन प्रमोद कोल्हे यांनी केले तर आभार डॉ घनश्याम मक्का सरे यांनी मानले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे सहयोगी सदस्यांनी प्रयत्न केले. कुठलिही अनुचित घटना घडू नये, यासाठी पोलीस स्टेशनचे ठाणेदार मनोज काळबांडे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत मादी बिबट्याचा मृत्यु

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २९ :

नागपूर - जबलपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील कांद्री मॉईल गोपालनगर परिसरात एका भरधाव वाहनाच्या धडकेत मादी बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ही घटना आज दि.२९ डिसेंबर ला सकाळी ७ वाजताच्या सुमारास घडली अशी प्राथमिक माहिती आहे.



प्राप्त माहितुनसार, नागपूर - जबलपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील कांद्री मॉईल गोपालनगर परिसरात महामार्ग ओलांडत असतांना एका अज्ञात भरधाव वाहनाने ५ ते ६ वर्षाच्या मादी बिबट्याला जोरदार धडक दिली. यात घटनास्थळीच बिबट्याचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती रामटेक वनविभागाला देण्यात आली. वनविभागाची टीम घटनास्थळी पोहचली व बिबट्याचे शव पुढील प्रक्रियेसाठी रामटेक येथे नेण्यात आले. तपास करून धडक देणाऱ्या वाहनावर कारवाई करण्यात येईल अशी माहिती रामटेक वनपरीक्षेत्र अधिकारी अनिल भगत यांनी दिली.

# श्री साईनाथ कॉन्व्हेंट राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेत प्रथम




■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २९ :

श्री साईनाथ कॉन्व्हेंट अँड ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक सुरज शेंडे यांच्या मार्गदर्शनात दुर्ग ,झारखंड येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे.

नृत्य स्पर्धेत नंदिनी धवराल, रेचल डोंगरे, आर्ची कांबळे,श्रेयश मेश्राम, अथर्व केळझरे, सम्यक गवई,गुंजन मेश्राम,दिव्यांश लोखंडे,श्रेयशी चौधरी,मानसी सोमकुवर, अवनीता मेश्राम,प्रिन्स भंडारी यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांना यशाबद्दल संस्थेचे संचालक शशांक शेखर , चेअर पर्सन चितप्रिया शेखर, प्राचार्य रविंद्र पाखरे, उपप्राचार्या हर्षा राजूरकर, शिक्षिका शुभांगी पाखरे, अंकिता चारबे,मनीषा चौधरी, अश्विनी कापसे, श्रद्धा चौधरी, कोमल डोंगरे, मयुरी डुले, हिमांशू गाढवे, मयुरी शिंगारे, पायल डहाके, स्मिता पाचघरे, प्रतीक्षा केचे, रम्या उटला, ज्योती शेंडे, प्रांजली उगवेकर,अजय गायकी, राजीव वाजपेयी, मोहिनी बहादुरे, मीना हिवसे, सुनंदा मोहोड, प्रफुल्ला लकडा, दिक्षा गजभिये आदींनी अभिनंदन केले.

# सीतापूर येथे कोया पुनेम सप्तरंगी ध्वजारोहण व जनजागृती कार्यक्रम



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २९ :

आज दिनांक 28 /12/ 2024 ला रामटेक तालुक्यातील सीतापुर या गावी कोया पुनेम सप्तरंगी ध्वजारोहण व जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले.

यावेळी गोंगो विधि तिरु. भूमका आसारामजी मसराम, लक्ष्मणजी उईके भूमका, सलामे भूमका यांच्या उपस्थितीत पार पडले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सन्माननीय तिरू. गोंडवाना गणतंत्र पाटीर्चे प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य अध्यक्ष हरीशभाऊ उईके प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच मुख्याध्यापिका दुर्गावती सर्याम, हरिश्चंद्र सर्याम तसेच गावातील इतर प्रतिष्ठित नागरिक व संपूर्ण मातृशक्ती पितृशक्ती युवक मित्र उपस्थित होते.

# कामठी शहरात दिवंगत डॉ. मनमोहन सिंग यांना भावपूर्ण श्रद्धांजली



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २९ :

शहर कॉंग्रेस कमेटीच्या वतीने कॉंग्रेस कार्यालय गांधी भवनात शहर अध्यक्ष रमेश दुबे यांच्या अध्यक्षमध्ये माजी पंतप्रधान दिवंगत डॉ मनमोहन सिंह यांनाशोकाकुल वातावरणात भावपूर्ण श्रद्धांजली देण्यात आली.

याप्रसंगी माजी अध्यक्ष नगर परिषद नीरज यादव, माजी उपाध्यक्ष अहफाज अहमद ठेकेदार, नगर कॉंग्रेस कमेटीचे उपाध्यक्ष व प्रभारी लक्ष्मण संगेवार, सेवादलाचे अब्दुल सलाम अंसारी, राज कुमार गेडाम प्रकाश लाईनपांडे, छावनी परिषद सेवादल अध्यक्ष रितेश यादव, उपाध्यक्ष सोमेश जेटली, प्रमोद खोब्रागडे, नितेश यादव, उबेद अफरोज, सुरैया बानो, शशिकला देशमुख, शाहिन शेख, चेतना ताई गोडबोले, अंबिकाबाई रामटेके, सोफिया खान, विभा मेश्राम, शमसुन्निसा बाजी, शबाना परवीन, विष्णूजी चनोडे, आनंद खोब्रागडे आदी उपस्थीत होते.

भ्रष्टाचार विरोधी जनआक्रोश म. रा. भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोश महाराष्ट्र राज्य कामठी शाखेच्या वतीने चंद्रमनी नगर येथील कार्यालयांत मांजा प्रधानमंत्री दिवंगत डॉ. मनमोहन सिंह यांना सर्वांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. याप्रसंगी मुमताज हैदरी, जफर अब्बास, हुसैन अली, सुरेश अढाऊ गुरुजी, माहीती अधिकार कार्यकर्ता रमेश कुमार बाली, अनिरुद्ध तांबे, मनोहर खुरगे, पुरूषोत्तम सेलोकर, आदी उपस्थीत होते.

# पेन्शनधारकांना सादर करावे लागणार जीवन प्रमाणपत्र

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २९ :

राज्य शासनाच्या निवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळणाऱ्या बँकेतून जीवन प्रमाणपत्र घेऊन सादर करावे लागणार आहे. संबंधित बँक शाखेकडून जीवन प्रमाणपत्राचे रजिस्टर प्रमाणित करण्याचे आवाहन, अपर कोषागारे (निवृत्त वेतन) अधिकारी यांनी केले आहे.

निवृत्ती वेतनधारकांनी आपापल्या बँकाकडे पाठपुरावा करून यासंदर्भातील कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना कोषागाराकडून देण्यात आल्या आहेत. संबंधित बँकांना यापूर्वीच कोषागाराकडून मुदत देण्यात आली होती.

निवृत्ती वेतनधारकांनी जीवन प्रमाणपत्राचे रजिस्टर प्रमाणित करुन कोषागारास सादर न केल्यास निवृत्तीवेतन देण्यास विलंब होऊ शकतो, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

# कांद्री येथे श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची पुण्यतिथि

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २९ :

श्री हनुमान मंदिर देवस्थान खदान रोड कांद्री, बैठक हॉल दिनांक 28 डिसेंबर 2024 रोज शनिवार सायंकाळी संत संताजी जगनाडे महाराज फोटोचे विधिवत पूजन कृष्णाजी किरपान, शामराव चकोले, केशव मस्के, गंगाधर सरोदे,जेष्ठ नागरिक आणि प्रमुख मान्यवर बलवंत पडोळे, माजी सरपंच, चंद्रशेखर बावनकुळे, अनिल पोटभरे, ईश्वर कामडे, मारोती आष्टनकर, प्रविण आखरे, शैलेश हिंगे, सिताराम बावनकुळे भैय्या मेहरकुळे, राजेश पोटभरे, शिवशंकर चकोले, आनंद देशमुख, आकाश कापसे आणि समस्त गावकरी नागरिक प्रामुख्याने हजर होते.

संत संताजी जगनाडे महाराज यांचे कार्याबद्दल माजी सरपंच बलवंत पडोळे, अनिल पोटभरे, राजुभाऊ देशमुख यांनी संबोधित केले. आरती, प्रसाद, अल्पोहार वाटप करण्यात आले. आभार प्रदर्शन प्रशांत देशमुख, श्याम मस्के यांनी केले.

# बैलवाड्यात नि:शुल्क रोग निदान शिबीर

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २९ :

नागपूर तालुक्यातील बैलवाडा येथे शालिनीताई मेघे हॉस्पीटल अॅन्ड रिसर्च सेंटर तर्फे भव्य नि:शुल्क आरोग्य तपासणी व रोगनिदान शिबिराचे आयोजन सरपंच निकीता शेटे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. शिबीरात ४०० रुग्णाची तपासणी केली. शालिनीताई मेघे हॉस्पीटल अॅन्ड रिसर्च सेंटर मध्ये शालिनीताई सुकन्या आरोग्य योजनेचा लाभ मिळणार आहे. दवाखान्यात जन्माला आलेल्या



मुलीला योजनेचा लाभ मिळेल. सर्व उपचार व तपासणी मध्ये आजन्म १०० टक्के सुट राहील. कुटुंब आरोग्य कार्ड योजना अंतर्गत हॉस्पिटल बिल मध्ये ५० टक्के सुट. प्रसुती, सिझेरिअन, शस्त्रक्रिया व इतर तपासणी मध्ये ५० टक्के सुट.जेष्ठ नागरिक कार्ड आरोग्य योजना अंतर्गत सर्व ६० वर्षावरील जेष्ठ नागरिकांना योजनेचा लाभ मिळेल. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णाला भरती करणे व इतर संबंधित खर्च खर्चात रुपये १ लाख ५० हजार पर्यंत सुट रिनल ( किडनी ) ट्रान्सप्लांटसाठी प्रति कुटुंब रुपये २ लाख ५० हजार पर्यंत सुट कुटुंबातील प्रत्येक सदस्याकरिता या योजनेचा लाभ उपलब्ध आहे. सर्व प्रकाराच्या उपचारांवर व शास्त्रक्रियानंतर ५० टक्के सुट कार्ड निशुल्क व आजिवन वैध राहिल.

# विर बाल दिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २९ :

दत्तवाडीतील आमदार समीर मेघे यांच्या जनसंपर्क कार्यालयात भाजपा वाडी मंडळा तर्फे "विर बाल दिवस " निमित्त गुरु गोविन्द सिंहजी यांचे दोनही पुत्र साहिबजादे बाबा जोरावर सिंहजी आणि बाबा फतेह सिंहजी यांना नमन यांचे शौर्य आणि अप्रतीम बलीदानाची गाथा अद्भुत आहे. यांचे प्रतीमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी भाजपा वाडी मंडळ अध्यक्ष आनंदबाबु कदम, प्रशांत श्रीवास्तव, ईशांत राऊत, जयदेव शेवरान, विशाल डोंगरे, सुधीरसिंह राणा, राहुल तायडे, लिलाधर भोयर, आनंद यादव, पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

# राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांच्या योगदानातून गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २९ :

राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रामटेक येथे नुकताच गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ २००७ च्या बॅचच्या वतीने नुकताच पार पडला.संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार आनंदरावजी देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या समारंभात उपाध्यक्ष डॉ. कमलाकर लेंडे, सचिव मयंक देशमुख, कोशाध्यक्ष अंशुल देशमुख, सदस्य नीलकंठ महाजन, घनश्याम बर्वे तर प्रमुख अतिथी म्हणून माजी प्राचार्य दीपक गिरीधर व माजी पर्यवेक्षक राधेश्याम गायधने, प्राचार्य राजु बर्वे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक निलेश टोंगसे, राहुल जोहरे तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सदस्य होमराज हजारे उपस्थित होते.




२००७ च्या बॅचचे माजी विद्यार्थी मेजर प्रशील ढोमणे, डॉ निकुंज शरणांगत, निखिल डांगरे, अभिलाष बागडे, भुषण बागडे,प्रितेश बागडे,मयुरी भिलकर, प्रतिभा तेलरांधे, प्रतिमा बंधाटे,किरण कोठारूचे पालक परमेश्वर कोठारू, ललिता कोठारू,मयूर गजभिये, स्वप्नील पडोळे,इमलेश दमाहे, प्रितेश बागडे यांनी कार्यक्रमास स्वतः उपस्थित राहून रोख स्वरूपाची बक्षीसे कु सर्वज्ञा वेदप्रकाश मोकदम, वेदांत धनराज घरझाडे,दुर्गा हिरामण चांपूरकर, सृष्टी सुनील मेंढे, त्रिपगथा दामोदर धोपटे, हिमानी नरेश मसुरके, साहिल राजु कारामोरे, क्रिश राजु मेश्राम, उत्कर्षा सुभाष महाजन, प्राजक्ता शांताराम टिपले,श्रावणी शिवदास पिसे, यश प्रकाश हटवार, यश जीवन श्रीरामे, गुंजन ज्ञानेश्वर ठाकरे, आराध्या संजय धारणे, शोर्या अनिल शेंडे, निशांत नंदकिशोर महाजन या दहावीची परीक्षा, एनएमएस परीक्षा,क्रीडा, खेळ, चित्रकला स्पर्धेत गुणवत्तेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना वितरीत केले.

बारावीच्या परीक्षेत कला व विज्ञान शाखेतून प्रथम येणाऱ्या कु. मीनाक्षी गुरनुले व कु.आशका परिहार यांना सचिव मयंक देशमुख यांच्या वतीने रोख पुरस्कार देण्यात आले.पाचवी ते नववीतील भार्गव वेदप्रकाश मोकदम, युगांशी राजकुमार जामगडे, साक्षी लीलाधर माकडे, गुंजन ज्ञानेश्वर ठाकरे अर्पिता नागोराव मसुरके या विदयार्थ्यांना रोख पुरस्कार उपाध्यक्ष डॉ कमलाकर लेंडे यांच्या वतीने देण्यात आले.

गणित विज्ञान प्रदर्शनात गणित व वैदिक गणित प्रतिकृती स्पर्धेत प्रथम क्रमांक जय नारनवरे व समृद्धी पाठक,द्वितीय क्रमांक नयनसी नेवारे व दर्शन थोटे तृतीय क्रमांक भार्गवी घरझाडे व यश हटवार यांना स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

सर्व माजी विदयार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त करतांना शाळेतून मिळालेले आणि शिक्षकांनी संस्कारातून आमच्या जीवनाला आकार मिळाला असे भावोदगार काढले. राष्ट्रीय आदर्श विद्यालयातील विद्यार्थी भारतीय सैन्यात मेजर पदावर कार्यरत असलेल्या मेजर प्रशील ढोमणे यांनी, " शाळा हा आयुष्यातील फार महत्वाचा घटक आहे.शाळेतील मित्र, पुस्तक, शिक्षक यांच्या संस्कारातून विद्यार्थी घडत जातो. ज्याला आपलं भविष्य घडवायचं आहे त्यांनी सर्वोत्तम शिक्षक व सर्वोत्तम शिक्षणाशी नेहमी सोबत ठेवावी.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य राजु बर्वे यांनी, "विद्यार्थ्यांचे जीवन हे स्वतःची, समाजाची व राष्ट्राची प्रगती करण्यासाठी आहे. जर विद्यार्थ्यांचे भविष्य घडेल तर राष्ट्राची प्रगती होईल "असे विचार व्यक्त केले. प्रमुख अतिथी दीपक गिरीधर व राधेश्याम गायधने यांनी, "संस्कार संपन्न शाळा व शिक्षक हे फक्त विद्यार्थ्यांचेच आधारस्तंभ नसतात तर ते सामाजिक व राष्ट्रप्रगतीचेही आधारस्तंभ असतात.

कार्यक्रमाचे अध्यक्ष होमराज हजारे यांनी, "संस्था, संचालक मंडळ, शाळा, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि समाज हे सर्वच समाज व राष्ट्राची प्रगती करणारे महत्वपूर्ण घटक असून या साखळीतील एक घटक जरी कमकुवत असला किंवा गळून पडला तर त्याचे विपरीत परिणाम भोगावे लागू शकतात. प्राचार्य राजु बर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्यासाठी सुनील सेलोकर,सुनील हटवार, विठ्ठल वाघाडे, नरेश रुखमोडे, नागोसे मॅडम,अरविंद कोहळे, राजेश भोतमांगे, रंगराव पाटील शाळेतील शिक्षक व कर्मचारी वर्ग यांनी प्रयत्न केले.

# श्री संत गुलाबबाबा शिक्षण संस्था उमरेड अंतर्गत संयुक्त स्नेहसंमेलन सोहळा

■ महासागर प्रतिनिधी
उमरेड, दि. २९ :

गौरवशाली ५५ वर्ष श्री संत गुलाबबाबा शिक्षण संस्था उमरेड अंतर्गत येणाऱ्या अशोक प्राथमिक शाळा, अशोक कन्या विद्यालय, अशोक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,रणधीरसिंह भदोरिया महाविद्यालय यांचे संयुक्त स्नेहसंमेलन सोहळा अशोक विद्यालय ज्युनियर कॉलेज उमरेड च्या प्रांगणात आयोजित करण्यात आला.

याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. कल्पना पांडे (अध्यक्ष-नागपूर विद्यापीठ शिक्षक मंच,माजी-महापौर नागपूर महानगरपालिका) यांच्या हस्ते उदघाटन विधिवत करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जीवनात विद्यार्थ्यांनी मनात जिद्द ठेऊन आत्मविश्वास जागृत करावा तरच तुम्ही तुमच्या जीवनात यशस्वी बनू शकता हे मूलमंत्र त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय मेश्राम आमदार -उमरेड विधानसभा क्षेत्र, विशेष अतिथी राजू पारवे माजी आमदार, विशेष अतिथी सुधीर पारवे माजी आमदार, राम भाकरे, (अध्यक्ष श्री संत गुलाब बाबा शिक्षण संस्था उमरेड), लेमन बालपांडे (उपाध्यक्ष- श्री संत गुलाब बाबा शिक्षण संस्था उमरेड), श्रीराम नंदनवार (सदस्य- श्री संत गुलाब बाबा शिक्षण संस्था उमरेड), आनंद चुडे (सदस्य-श्री संत गुलाब बाबा शिक्षण संस्था उमरेड), मा. भगवानजी वाईलकर (सदस्य-श्री संत गुलाब बाबा शिक्षण संस्था उमरेड),शशिकलाताई बेले (सदस्य- श्री संत गुलाब बाबा शिक्षण संस्था) जितेंद्रसिंह बैस (सदस्य- श्री संत गुलाब बाबा शिक्षण संस्था) शैलेजाताई भदोरिया, मयंक भदोरिया, शिरीष मेश्राम, देवराव पाटील (सेवानिवृत्त मुख्याद्यापक, अशोक विद्यालय, उमरेड, अलका रेवतकर (सेवा निवृत्त मुख्याद्यापिका झअशोक कन्या विद्यालय,उमरेड ) सतीश खर्चे (सेवानिवृत्त उप- मुख्याद्यापक झअशोक विद्यालय,उमरेड )यांच्या उपस्थितीत हा उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला.

या संयुक्त स्नेहसंमेलनामध्ये विद्यात्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी विविध सांस्कृतिक, बौद्धिक, रांगोळी, पाककला, चित्रकला, क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये रणधीरसिंह भदोरिया महाविद्यालयाच्या रातुम नागपूर विद्यापीठ द्वितीय मेरीट आलेली कु.अंकिता भुजबळ व दहावी मेरीट आलेली कु.निकिता पाटील,आर्या पोन्नाडे (अंडर -१९ विदर्भ क्रिकेट असोसिएशन महिला क्रिकेट निवड) अमिषा साडेकर(राज्यस्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धा सहभाग झनांदेड), साहिल मोहरकर (राज्यस्तरीय शालेय क्रास कंट्री स्पर्धेत सहभाग झपुणे ), कांशी माटे ,प्रशिक्षक अमोल रायपूरकर ( जलतरण स्पर्धा लिम्का बुक रेकॉर्ड) यांचे मान्यवराच्या हस्ते पारितोषित देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. विजयलक्ष्मी भदोरिया माजी नगराध्यक्ष, तथा सचिव श्री संत गुलाब बाबा शिक्षण संस्था, सूत्रसंचालन कु.आस्था पाठक, निधा पटेल ,तर आभार नेहा भदोरिया (सदस्य- श्री संत गुलाब बाबा शिक्षण संस्था) यांनी केले. या कार्यक्रमाला सफल करण्यासाठी,श्री संत गुलाबबाबा शिक्षण संस्था उमरेड द्वारा संचालित सर्व शाळा महाविद्यालयाचे मुख्याध्यापक व प्राचार्य, माजी शिक्षक, माजी विद्यार्थी, संस्था सदस्य, उमरेड न.प. चे माजी नगरसेवक, अशोक विद्यालय उमरेड, अशोक ज्युनिअर कॉलेज उमरेड, अशोक कन्या विद्यालय उमरेड, अशोक प्राथमिक शाळा उमरेड, रणधिरसिंह भदोरिया महाविद्यालय उमरेड ,रणधिरसिंह भदोरिया मित्र मंच ,) शिक्षक, इतर कर्मचारी,तसेच विद्यार्थी यांनीं मौलिक सहकार्य केले.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३




# वर्षअखेर विशेष २०२४




## युद्ध आणि उलथापालथीचे वर्ष

**जगात २०२४ मध्ये अनेक ठिकाणी उलथापालथी झाल्या. जर्मनी, फ्रान्स, दक्षिण कोरिया या देशातील सरकारे अस्थिर आहेत तर श्रीलंका, ब्रिटन, अमेरिकेमध्ये सत्तांतर झाले. रशिया–युक्रेन आणि मध्य पूर्वेतला संघर्ष काही थांबायला तयार नाही. बांगलादेश, सीरियामध्ये बंड झाले. तिथे प्रदीर्घ काळ सत्तेत असलेली सरकारे बंडखोरांनी उलथवून टाकली. त्यातल्या त्यात दक्षिण आशियामध्ये जास्त अशांतता आणि अस्थिरता दिसली.**

वर्षअखेर विशेष २०२४

**प्रा. डॉ. विजयकुमार पोटे**

आता नवीन वर्षाची सुरुवात होणार आहे. २०२४ मध्ये जगभरात अनेक महत्त्वाच्या राजकीय घटना घडल्या. भारतात नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले. अमेरिकेत भारतीय वंशाच्या कमला हॅरिस यांना हरवून डोनाल्ड ट्रम्प अध्यक्ष झाले. अमेरिकेतील पुरुषी मानसिकता अजूनही जात नाही, हे गेल्या बारा वर्षांमधील दोन महिलांच्या पराभवातून दिसून आले. रशिया–युक्रेन युद्ध दोन वर्षांनतर सुरूच आहे. फेब्रुवारी २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर आक्रमण केले आणि बराचसा भाग ताब्यात घेण्यास सुरुवात केली. दुसऱ्या महायुद्धानंतरचा हा युरोपमधील सर्वात मोठा संघर्ष मानला जातो. या युद्धाला आता तीन वर्षे होतील; परंतु अजूनही ते संपण्याची चिन्हे नाहीत. या युद्धामुळे जगाने रशियावर अनेक बंधने घातली; परंतु त्यानंतरही रशियाची अर्थव्यवस्था सुधारली. आता तर रशिया अधिक मारक क्षेपणास्त्रे





वापरण्याची भाषा करतो आहे. युरोप आणि अमेरिका आतापर्यंत युक्रेनेच्या मागे होती. आता युरोपमधील संकट आणि अमेरिकेतील सत्तांतरामुळे 'नाटो' सदस्य युक्रेनच्या पाठिशी किती काळ उभे राहतात, हे पहायचे. रशिया–युक्रेनच्या प्रदीर्घ संघर्षामुळे संपूर्ण जग प्रभावित झाले आहे.

आता एक नजर एका मोठ्या सत्तांतरावर. आठवडाभरापूर्वी बंडखोरांनी सीरियाच्या वायव्येकडील इडलिबमधील तळावरून अचानक मोहीम सुरू केली, तेव्हा सीरियातील कोणीही बशर–अल–असादच्या पतनाबद्दल विचारही करत नव्हते. वडील हाफेज अल–असाद यांच्या निधनानंतर बशर अल–असद २००० मध्ये सत्तेवर आला. हाफेजने सीरियावर २९ वर्षे राज्य केले. त्याचा राज्यकारभारही त्याचा मुलगा असदच्या शासनाप्रमाणे हुकूमशाहीचा होता. म्हणजेच बशर–अल–असादला दमनकारी राजकारणाचा वारसा लाभला होता. असद आपल्या वडिलापेक्षा वेगळा वागेल, अशी अपेक्षा पूर्वी होती. पण या आशा फार काळ टिकू शकल्या नाहीत. २०११ मध्ये त्याच्या राजवटीच्या विरोधात शांततापूर्ण निदर्शने करणाऱ्यांना निर्दयपणे दडपून टाकणारा माणूस म्हणून बशर अल–असद हा नेहमीच लक्षात राहिला. त्याच्या निर्णयामुळे सीरियात गृहयुद्ध सुरू झाले. त्यात पाच लाखांहून अधिक लोक मारले गेले आणि सहा लाख लोक विस्थापित होऊन निर्वासित झाले. बशर अल–असद याने रशिया आणि इराणच्या मदतीने आपल्या विरोधकांना चिरडून सत्ता टिकवली.
रशियाने सीरियामध्ये जोरदार हवाई हल्ले केले. इराणने आपले लष्करी सल्लागार सीरिया आणि हिजबुल्लाला पाठवले, तर शेजारच्या लेबनॉनमध्ये त्याला पाठिंबा असलेल्या सशस्त्र गटाने आपले प्रशिक्षित सैनिक सीरियामध्ये लढण्यासाठी पाठवले. या वेळी मात्र तसे झाले नाही. स्वतः च्या समस्यांमध्ये व्यस्त असल्यामुळे मित्रदेशांनी सीरियाला वाऱ्यावर सोडून दिले. सीरियातील असद कुटुंबाची पाच दशकांची राजवट संपुष्टात आल्याने या प्रदेशातील सत्तेचा समतोल बदलू शकेल.



सरत्या वर्षी पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांची एका प्रकरणात तुरुंगातून सुटका होताच नोव्हेंबर २०२४ मध्ये दुसऱ्या एका प्रकरणात पुन्हा अटक करण्यात आली. त्यामुळे पाकिस्तान–तेहरिक–ए–इन्साफ (पीटीआय) पक्षात खळबळ उडाली. इस्लामाबाद उच्च न्यायालयातून जामीन मिळाल्यानंतर काही तासांनंतर, रावळपिंडी पोलिसांनी दहशतवाद आणि इतर आरोपांखाली न्यू टाऊन पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या गुन्ह्याच्या संदर्भात त्यांना अटक केली. त्याच्या अटकेवरून पाकिस्तानमध्ये पुन्हा एकदा अराजक निर्माण झाले. गोळीबारात अनेक कार्यकर्ते ठार झाल्याने माजी पंतप्रधान इम्रान खान यांचा पक्ष 'पाकिस्तान तेहरीक–ए–इन्साफ' (पीटीआय)ने चार दिवसानंतर आंदोलन तात्पुरते मागे घेतले असले, तरी ही वादळापूर्वीची शांतता आहे. दीड वर्षांहून अधिक काळ तुरुंगात असलेले इम्रान खान यांची सुटका व्हावी, हा या आंदोलनाचा उद्देश होता.

बांगलादेशमध्ये या वर्षी जानेवारीमध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये पंतप्रधान शेख हसीना सलग चौथ्यांदा जिंकल्या होत्या; पण सहा महिन्यांनंतर विरोधातील उद्रेक इतका उग्र झाला की त्यांना ऑगस्टमध्ये राजीनामा देऊन देश सोडावा लागला. सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षणाविरोधात विद्यार्थ्यांचे आंदोलन जुलैमध्ये सुरू झाले. या वेळी हजारो विद्यार्थी रस्त्यावर आले. १६ जुलै रोजी निदर्शनाला हिंसक वळण लागले. अधिकाऱ्यांना अश्रुधुराचा, रबराच्या गोळ्यांचा वापर करावा लागला आणि गोळीबाराच्या आदेशासह संचारबंदी लागावी लागली. या अराजकतेमुळे शेख हसीना यांनी देश सोडल्यानंतर काही काळ भारतात आश्रय घेतला आणि तिथे मोहम्मद यूनूस यांच्या नेतृत्वात हंगामी सरकार स्थापन झाले. हंगामी सरकारने आता चीन आणि पाकिस्तानच्या कच्छपि लागून भारताविरोधात मोहीम सुरू केली आहे. भारतीय मालाच्या आयातीवर बंदी, पाकिस्तानच्या जहाजांना चितगाव बंदरावर तपासणीविना प्रवेश या पावलांमुळे आता भारताच्या ईशान्येकडील राज्यात अतिरेकी कारवाया वाढण्याची भीती आहे.

सरत्या वर्षात ब्रिटनमधील निवडणुका बऱ्याच गाजल्या. ब्रिटनमधील सत्ताविरोधी लाटेने सत्ताधारी हुजूर पक्षाचा सफाया केला. १४ वर्षांची प्रतीक्षा संपवून मजूर पक्ष जुलै २०२४ मध्ये पुन्हा सत्तेत आला. केयर स्टार्मर यांची पंतप्रधानपदी नियुक्ती करण्यात आली. ऋषी सुनक यांना ब्रिटीश निवडणुकीत दारूण पराभव पत्करावा लागला. केवळ भारत आणि ब्रिटनमध्येच नव्हे, तर जगभरात हा चर्चेचा विषय बनला. नोव्हेंबरमध्ये अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ट्रम्प विजयी झाले. ट्रम्प यांनी प्रतिस्पर्धी कमला हॅरिस यांचा पराभव करत विजयासाठी आवश्यक २७० इलेक्टोरल मतांचा टप्पा ओलांडला. ट्रम्प यांनी २०१६ मध्ये निवडणूक जिंकली आणि २०२० मध्ये पराभूत झाल्यानंतर परत २०२४ मध्ये विजय मिळवला हे १३२ वर्षांनंतर प्रथमच घडले. याआधी १८८४ आणि १८९२ मध्ये ग्रोव्हर क्लीव्हलँड अध्यक्ष झाले होते. अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांच्या निवडीचे जगावर काय परिणाम होतील, याची चर्चा अद्याप थांबली नसतानाच ट्रम्प आणि त्यांचे निवडणुकीतील पाठीराखे एलन मस्क यांनी केलेल्या वक्तव्याचे पडसाद आता कॅनडामध्ये उमटायला लागले आहेत. आतापर्यंत खलिस्तानी अतिरेक्यांना पाठीशी घालणाऱ्या आणि भारताविषयी सातत्याने फुत्कार करणारे कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांची भाषा दोनच दिवसांमध्ये बदलली. भाषा बदलली, तरी मूळ स्वभाव थोडाच बदलतो? एकीकडे कॅनडामध्ये खलिस्तानी अतिरेकी असल्याचे मान्य करायचे आणि त्याच वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करायची, ही दुटप्पी नीती झाली. कॅनडाची अर्थव्यवस्था सध्या संकटात आहे. तिथे बेरोजगारी प्रचंड वाढली आहे. महागाईने कळस गाठला आहे. अशा परिस्थितीत देशांतर्गत प्रश्नांवरून लोकांचे लक्ष विचलीत करण्यासाठी जस्टिन ट्रुडो भारतविरोधी मोहिमेला बळ देत होते. कॅनडा लवकरच निवडणुकीला सामोरे जात आहे. या निवडणुकीमध्ये जस्टिन ट्रुडो यांचे काही खरे नाही, अशी चर्चा सुरू असतानाच मस्क यांनी जस्टिन ट्रुडो यांची अखेर जवळ आहे, असे वक्तव्य केल्याने कॅनडामधील सत्ताधारी पक्ष आणखी चिंतेत पडला. कॅनडा हा जगातील सर्वाधिक व्यापारावर अवलंबून असलेला देश आहे. कॅनडाची ७५ टक्के निर्यात अमेरिकेत होते. ट्रम्प यांनी 'नॉर्थ अमेरिकन फ्री ट्रेड ॲग्रीमेंट' (नाफ्ता) वर फेरविचार करण्याच्या हालचाली आणि ऑटो सेक्टरवर २५ टक्के शुल्क लावण्याचा विचार करत असल्याच्या अहवालामुळे कॅनडा सरकारच्या पोटात भीतीचा गोळा आला आहे.



गाझामध्ये सुरू असलेल्या संघर्षात आणखी एक मोठा विजय मिळवत इस्त्रायली सैन्याने हमास नेता याह्या सिनवारला यंदा चकमकीत ठार केले. याआधी, लेबनॉनमधील 'हिजबुल्ला'वर झालेले हल्ले आणि त्याचा म्होरक्या हसन नसराल्लाची हत्या हे या युद्धाचे महत्त्वाचे वळण होते. बड्या म्होरक्यांच्या हत्येमुळे संघटनेतील लोकांचे मनोधैर्य खचते. या संधीचा फायदा घेत इस्त्रायली सैन्याने लेबनॉनमध्ये जमिनीवर हल्ला केला; जेणेकरून लोक उत्तर इस्त्रायलमध्ये परत जाऊ शकतील. यंदा नेपाळमध्ये पुन्हा एकदा वेगळी युती करून डावे आणि काँग्रेसचे सरकार आले. श्रीलंकेत सत्तांतर झाले. मार्क्सवादी नेता अनुरा कुमारा दिसनायके किंवा एकेडी यांनी अध्यक्षीय निवडणुकीत ४२ टक्क्यांपेक्षा जास्त मते घेतली. दोन वर्षांपूर्वी श्रीलंकेत झालेल्या अभूतपूर्व अशा सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समस्येनंतर या निवडणुकांना अतिशय महत्त्व आले होते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने श्रीलंकेला २.९ बिलियन डॉलर्सचं बेलआउट पॅकेज दिले होते. या पॅकेजच्या बदल्यात रनिल विक्रमसिंगे यांना श्रीलंकेत मोठ्या प्रमाणावर जाचक अटी लादाव्या लागल्या होत्या. सर्वसामान्य श्रीलंकन नागरिकांवर मोठ्या करांचा भार तसेच अनेक क्षेत्रात निधी कपात करावी लागली होती. यामुळे सर्वसामान्य श्रीलंकन जनतेचा रोष मतपेटीतून व्यक्त झालेला दिसतो.

✦✦✦



## शिक्षणवाटांचे भवितव्य जोखणारे वर्ष

**समृद्ध राष्ट्राचा दर्जा मिळवण्यासाठीच नाही तर देशातील तरुण लोकसंख्येचा लाभ घेण्याच्या दृष्टीनेही दर्जेदार शिक्षण महत्त्वाचे आहे. हे लक्षात घेऊनच आता चांगल्या भवितव्यासाठी ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये शिक्षणप्रणाली विकसित होत आहे. हे वर्ष या प्रक्रियेत मैलाचा दगड रोवून गेले. या वर्षात सार्वजनिक शिक्षण व्यवस्था, त्यातील पायाभूत सुविधांसारख्या अनेक विषयांची उत्तम चर्चा झाली.**

वर्षअखेर विशेष २०२४

**मंजिरी ढेरे**

समाजाच्या नेमक्या विकासासाठी शिक्षणक्षेत्र हे आत्यंतिक महत्त्वाचे असून बदलत्या काळाची आव्हाने लक्षात घेत त्यात आवश्यक ते बदल करणारा देश आघाडी घेतो, हे आत्तापर्यंत अनेकदा सिद्ध झालेले आहे. शिक्षण विद्यार्थ्यांना साक्षर करणारे असावेच, खेरीज त्यामध्ये संस्कार करण्याची, नव्या पिढीला चारित्र्यवान, ध्येयनिष्ठ बनवण्याची ताकद असावी आणि मुख्य म्हणजे शिक्षणाने चांगला माणूस घडवावा अशी अपेक्षा असते. सध्या तर जग आणखी जवळ येत आहे. कार्यक्षेत्रे विस्तारत आहेत. व्यवसाय, धंदा, शिक्षणासाठी जगाच्या कानाकोपऱ्यात जाण्याची ओढ आणि गरजही वाढत आहे. हे सगळे लक्षात घेता अलिकडच्या काळात शिक्षणक्षेत्रामध्येही यथोचित बदल होताना दिसत आहेत. मुख्य म्हणजे नवी शिक्षणप्रणाली मुलांना पुस्तकातील किडे न बनवता त्यांच्या कौशल्यविकासावर भर देणारी असून त्यांना रोजगारक्षम बनवण्यात, अर्थसज्ञ करण्यातही महत्त्वाची भूमिका बजावत आहे. त्यामुळेच नवीन शिक्षण धोरणाचे महत्त्व जाणवून देणारे वर्ष असाही सरत्या वर्षाचा उल्लेख करावा लागेल. एकूणच भारतीय शिक्षण व्यवस्थेत गेल्या काही दशकांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण बदल होताना दिसत आहेत. भारत स्वतंत्र झाल्यानंतरचा बराच काळ शिक्षणाकडे फारसे कोणी लक्ष दिलेले दिसले नाही. खेरीज मुलींच्या शिक्षणाकडेही गांभीर्याने पाहण्याची दृष्टी देशात बराच काळ नव्हती. त्यामुळे अगदी काही वर्षांपूर्वीपर्यंत फक्त पुरुषांनीच शिक्षण घेतले पाहिजे, अशी मानसिकता असणारा हा एक देश होता. मात्र १९९१ मधील उद्योग उदारीकरणानंतर देशासाठी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देण्यास सुरूवात झाली आणि या क्षेत्रावर लक्ष केंद्रित होत गेले.

अलिकडे भारतात पूर्व–प्राथमिक शाळा, प्राथमिक–माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे यांचे विस्तृत नेटवर्क निर्माण करण्यावर तसेच ते ताकदवान करण्यावर भर दिला जात आहे. सरत्या वर्षात या अर्थाने महत्त्वपूर्ण पावले उचलली गेल्याचे दिसले. सरत्या वर्षात स्पर्धा परीक्षांमधील घोटाळ्याची, पेपरफुटीची, पूजा खेडकर प्रकरणाची आणि यासारख्या अन्य अनागोंदींची चर्चा चांगलीच रंगली. याविरुद्ध आवाज उठवण्यासाठी विद्यार्थ्यांच्या आंदोलनांनीही सरते वर्ष गाजवले. खेरीज कोलकातामधील रुग्णालयात प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवर झालेल्या पाशवी बलात्काराने समाजमन ढवळून निघाले. त्याचबरोबर कोटा शहरातील शिक्षणाचे बाजारीकरण, अतिताणापोटी तेथे विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचे वाढते प्रमाण हेदेखील २०२४ मधील चर्चेचे मुद्दे ठरले. मात्र अशा नकारात्मक पार्श्वभूमीबरोबर या वर्षात घडलेल्या काही चांगल्या घटनांची, निर्णयांची दखल घेत आश्वासकरित्या भविष्याकडे पाहणे गरजेचे आहे. तरच या क्षेत्राला भूतकाळातील चुका टाळून समर्थ भविष्याची पायाभरणी करता येईल.

चांगले, दर्जेदार शिक्षण हे केवळ समृद्ध राष्ट्राचा दर्जा मिळवण्यासाठीच नाही तर देशातील तरुण लोकसंख्येचा लाभ घेण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे. हे लक्षात घेऊनच आता देशाच्या चांगल्या भविष्यासाठी ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागांमध्ये शिक्षणप्रणाली विकसित होत आहे. २०२४ हे त्यातील मैलाचा दगड रोवून गेले. सरत्या वर्षात सार्वजनिक शिक्षण व्यवस्था, विशेषतः ग्रामीण भागामध्ये पायाभूत सुविधांसारख्या अनेक मुद्द्यांवर लक्ष केंद्रित झालेले दिसले. मागील वर्षीच्या शैक्षणिक स्थितीसंदर्भातील वार्षिक अहवालानुसार इयत्ता पाचवीची मुले दुसऱ्या इयत्तेची पाठ्यपुस्तकेही वाचू शकत नाहीत किंवा मूलभूत विभागणी समस्या सोडवू शकत नाहीत, असे समोर आले होते. मात्र हे ध्यानात घेऊनही २०२४–२५ च्या अर्थसंकल्पात सार्वजनिक शिक्षणासाठी जीडीपीच्या फक्त ०.४ टक्के वाटप केले गेले. ही बाब शिक्षणाकडे सातत्याने होणाऱ्या दुर्लक्षावर प्रकाश टाकणारी ठरली.

शाळांना अपुऱ्या पायाभूत सुविधा, अध्यापनाची खराब गुणवत्ता आणि व्यावसायिक आणि जीवन कौशल्य शिक्षणाचा अभाव यामुळे अनेक विद्यार्थी रोजगारासाठी किंवा पुढील शिक्षणासाठी तयार नसतात. मात्र सध्या चर्चेत असणाऱ्या कौशल्याधारित शिक्षणामुळे ही समस्या दूर होण्याची आशा यंदा व्यक्त केली गेली. थोडक्यात, शिक्षण क्षेत्रात लक्षणीय सुधारणा झाली असली तरी अजून बराच पल्ला गाठायचा आहे, हे २०२४ ने अधोरेखित केले. त्यातून धडा घेत काही पावले उचलली तर पुढील वर्षांमध्ये आपण अपेक्षित प्रगती करू शकतो.

त्यातील पहिली बाब अर्थातच प्राथमिक शिक्षणात डिजिटल एकीकरण करण्याची आहे. सध्याच्या इंटरनेट आणि स्मार्टफोनच्या वाढीमुळे ग्रामीण भागातही डिजिटल शिक्षण आवश्यक बनले आहे. भविष्यात आपण अधिक डिजिटल साधने आणि प्लॅटफॉर्मची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याची अपेक्षा करू शकतो. २०२४ मध्ये याची सुरूवात झाली असली तरी वेगाने शिकणाऱ्यांपर्यंत ही माहिती पोहोचवणे गरजेचे आहे. तरच त्याचा अधिक चांगल्या प्रकारे उपयोग होईल आणि मुलांना विषयाचे आकलन होण्यास, विषय समजण्यास मदत होईल. परस्परसंवादी ॲप्स आणि ऑनलाइन संसाधने मूलभूत वाचन आणि गणित कौशल्यांच्या विकासास चालना देतील. हे उपाय लहान आणि मोठ्या मुलांसाठी वैयक्तिकृत शिक्षण अनुभव प्रदान करतील. सरत्या वर्षात याची अनुभूती घेतल्यामुळे आता शिक्षणविश्व यासाठी सज्ज आहे, असे म्हणावे लागेल. विद्यार्थ्यांना एखादी समस्या जाणवते तेव्हा ते गुगलकडे वळत असल्याचे सरत्या वर्षात प्रकर्षाने पहायला मिळाले. खेरीज यंदा बाजारात विद्यार्थ्यांना पुरक ठरणारी अशी अनेक संसाधनेही बघायला मिळाली. थोडक्यात, २०२४ हे वर्ष प्रारंभिक शिक्षणामध्ये डिजिटल संसाधनांचा समावेश करून आपण वैयक्तिक शिक्षणाच्या गरजा पूर्ण करू शकतो आणि सुरुवातीपासूनच मूलभूत कौशल्ये सुधारू शकतो हे दाखवून देणारे ठरले.

त्याचबरोबर रोजगार बाजाराच्या गरजेनुसार अभ्यासक्रम संरेखित करण्यासाठी विद्यापीठे आणि उद्योग यांच्यातील सहकार्य वाढवणे हा उद्देशही सरत्या वर्षी एका पातळीपर्यंत यशस्वी झालेला दिसला. 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' यासारख्या उपक्रमांच्या अनुषंगाने उच्च शिक्षण संस्था संशोधन, नवकल्पना आणि स्टार्ट अप्सवर अधिक लक्ष केंद्रित करत आल्याचेही दिसून आले. त्याचबरोबर विदेशी सहयोग, विद्यार्थी देवाणघेवाण आणि परदेशी विद्यापीठांचे आंतरराष्ट्रीय कॅम्पस वाढत असल्याची स्थिती २०२४ मध्ये अनुभवास आली. येत्या काही वर्षांमध्ये त्यात आणखी वाढ होण्याची अपेक्षा आहे. याचाच अर्थ असा की, आता अधिक परदेशी विद्यापीठे भारतात प्रवेश करतील आणि त्यांच्याकडून जाहीर होणाऱ्या शिष्यवृत्ती आणि लवचिक कार्यक्रमांचा लाभ भारतीय विद्यार्थ्यांना मिळेल.

सरत्या वर्षात भारतातील 'एड्युटेक क्षेत्र' वेगाने वाढीला लागले. यंदा परस्परसंवादी आणि वैयक्तिक पद्धतींचा वापर करून प्राथमिक शिक्षणापासून व्यावसायिक विकास अभ्यासक्रमांपर्यंत याचा वाढता विस्तार बघायला मिळाला. शिक्षणसामग्रीची विस्तृत श्रेणीही यंदाचे वैशिष्ट्य ठरली. मात्र नूतन वर्षामध्ये प्रकाशक आणि सामग्रीप्रदात्यांनी अनुकूल शिक्षणसामग्री तयार करण्यावर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. ते साधले तर विद्यार्थ्यांच्या कार्यक्षमतेशी जुळवून घेणे या विश्वाला शक्य होईल. अलिकडच्या काळात स्वयं–प्रकाशन लोकप्रिय होत आहे. यामध्ये शिक्षक आणि तज्ज्ञ आपली सामग्री थेट विद्यार्थ्यांशी शेअर करतात. तेव्हा शिक्षण प्रणालीमध्ये एड्युटेक प्लॅटफॉर्म अधिक ठोसपणे आणि प्रभावीपणे सक्रिय झाल्यास विविध शिक्षण संसाधने उपलब्ध होऊ शकतात आणि माणसाला आजीवन शिक्षणास समर्थन मिळू शकते.

सरत्या वर्षात जाहीर झालेल्या एका अहवालानुसार भारतातील खाजगी शाळांमध्ये २६० दशलक्ष शालेय मुलांपैकी ४८ टक्के विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे समोर आले. सरकारी शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असल्याचेही या अहवालातून स्पष्ट झाले. याच अहवालात एकूण नोंदणी गुणोत्तरामध्ये सुधारणा, गळतीचे प्रमाण कमी करणे, चांगल्या शाळा, पायाभूत सुविधांमध्ये वाढ आणि चांगल्या विद्यार्थी–शिक्षक गुणोत्तराची गरजही नोंदवण्यात आली आहे. त्याचबरोबर शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा अवलंब करणे, शिकवण्याच्या पद्धती सुधारणे आणि जीवनकौशल्ये आणि सामाजिक–भावनिक शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्याचे महत्त्व देखील यात सांगितले आहे. थोडक्यात सांगायचे तर, भारतातील शिक्षण क्षेत्र सध्या एका महत्वाच्या टप्प्यावर उभे आहे असेच म्हणावे लागेल. २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र आणि पाच ट्रिलियनची अर्थव्यवस्था बनण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भारताला शिक्षणामध्ये गुंतवणूक करणे आणि गुणवत्ता आणि शिक्षणाची उपलब्धता वाढवणाऱ्या सुधारणांचा अवलंब करणे महत्त्वाचे आहे. हे साधले तर शिक्षणविश्वात नवे वारे वाहू लागणे फारसे कठीण नाही.

✦✦✦

# स्मृतीशेष मधुकर तामगाडगे चॅरिटेबल ट्रस्टमार्फत शैक्षणिक शिष्यवृत्ती वितरण सोहळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

आज दि. २९ डिसेंबर २०२४ ला स्मृतीशेष मधुकरराव तामगाडगे चॅरिटेबल ट्रस्ट जयवंत नगर नागपूर येथील मुख्यालयामध्ये शैक्षणिक शिष्यवृत्ती वितरणाचा सोहळा पार पडला. स्त्री-पुरुष असमानतेला तडा देण्यासाठी. मुलींना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन त्यांना शिक्षणासाठी प्रेरित करून, त्या शिक्षण घेत असताना त्यांच्या शिक्षणामध्ये कुठलाही सामाजिक किंवा आर्थिक अडथळा यायला नको यासाठी तामगाडगे परिवार नेहमीच प्रयत्नशील असतो. याच प्रयत्नाचे स्वरूप म्हणजे तामगाडगे ट्रस्टमार्फत सुरू करण्यात आलेली स्मृतीशेष मधुकरराव तामगाडगे शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना ही होय.




ही योजना गेल्या आठ वर्षापासून तामगाडगे ट्रस्ट द्वारा राबवली जाते. यावर्षी देखील ६० मुलींना या शैक्षणिक शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आली होती. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातील या मुलींना शैक्षणिक शिष्यवृत्ती वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ. रवींद्र सिंघल, आयपीएस पोलीस आयुक्त, नागपूर शहर नागपूर उपस्थिती होती. त्यांनी आपल्या भाषणामध्ये शिक्षणाचे महत्त्व व शिक्षणामुळे आपण आपली प्रगती कशी करू शकतो व सामाजिक जाणीव ठेवून समाजातील तळागाळातल्या लोकांसाठी आपण कार्य करायला हवे असे, त्यांनी आपल्या भाषणामध्ये आपले मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सन्माननीय अतिथी डॉ. सीमा पारवेकर वैद्यकीय अधीक्षक, एम्स नागपूर या कार्यक्रमाला लाभल्यात त्यांनी आपल्या भाषणामध्ये ट्रस्ट द्वारा चालवण्यात येणाऱ्या शैक्षणिक शिष्यवृत्ती व सिकलसेल कार्याची प्रशंसा केली व सिकलसेल रुग्ण करता सर्व प्रकारची मदत ट्रस्टला त्यांच्याद्वारे करण्यात येईल असे आश्वासन देखील दिले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आयु. कुसुमताई तामगाडगे यांना भूषविन्यातआले होते. तसेच मा. अनिल कोकाटे, डायरेक्टर महा मेट्रो नागपूर, डॉ. सिद्धार्थ गायकवाड, उपायुक्त समाज कल्याण विभाग, मा. धनंजय वंजारी, आयआरएस ॲडिशनल कमिशनर, इन्कम टॅक्स, मंगेश दहिवले, बुद्धिस्ट विचारवंत, ॲड. कुणाल नालमवार, कर्नल पीडी पाटील, नितीनचंद्र राजकुमार पीआय अजनी पोलीस स्टेशन नागपूर, लीना संदीप तामगाडगे, उपाध्यक्ष तामगाडगे ट्रस्ट, अर्चना उम्बर्गी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे संचालन पूजा कासवटे यांनी केले. तसेच सर्व मान्यवरांचे आभार मा. संदीप तामगाडगे, आयपीएस एडीजीपी नागालँड यांनी केले.

# स्मशानघाटात वृद्ध चौकीदाराची हत्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

गत काही दिवसांपासून गुन्हेगारी घटनांमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. त्यामुळे शहरात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सरत्या वर्षाच्या शेवटच्या आठवड्यात तर खूनसत्राने शहर हादरले आहे. सलग ५ हत्याकांडांनी नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. रविवारी दुपारी जरीपटका ठाण्यांतर्गत ख्रिश्चन कब्रस्तानात एका वृद्ध चौकीदाराची निर्घृण हत्या करण्यात आली. खून करून पळून जात असताना कब्रस्तानात अंत्यविधीसाठी आलेल्या लोकांनी आरोपीला पकडून पोलिसांच्या स्वाधिन केले. एनॉन पिअरजी (३९) रा. नवी वस्ती, सदर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. रमेश शेंडे (६८) असे मृताचे नाव आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, रमेश हे अविवाहित होते. ते जरीपटका परिसरातील भारतीय प्रोटेस्टंट ख्रिश्चन कब्रस्तानात चौकीदारी करायचे. तसेच पार्थिवाला दफन करण्यासाठी खड्डा खोदण्याचेही काम करीत होते आणि तेथेच रहात होते. आरोपी एनॉन हा सुद्धा अविवाहित आहे आणि आईसोबत राहतो. मिळेल ते काम करून तो स्वतःचा आणि आईचा उदरनिर्वाह करीत होता. रमेश यांच्याशी त्याची जुनी ओळख होती. दरम्यान काहीतरी कारणातून त्यांच्यात खटकले. रविवारी दुपारी ३.३० वाजताच्या सुमारास एनॉन याचा वचपा काढण्यासाठी कब्रस्तानात आला. त्याच दरम्यान एका कुटुंबाने दफन विधीसाठी पार्थिव आणले होते. खड्डा खोदून झाल्यानंतर रमेश काही अंतरावर जाऊन बसले. दफन विधीची प्रक्रीया सुरू असल्याने कोणाचेही त्यांच्याकडे लक्ष नव्हते. हिच संधी साधून एनॉनने धारदार शस्त्राने रमेश यांच्यावर हल्ला केला. सपासप वार करून रक्ताच्या थारोळ्यात लोळवले. रमेश यांचा ओरडण्याचा आवाज ऐकून लोकांचे त्यांच्याकडे लक्ष गेले. एनॉनने तेथून पळ काढला. मात्र लोकांनी पाठलाग करून त्याला पकडले. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. जरीपटका पोलिस घटनास्थळी पोहोचले. तत्पूर्वी लोकांनीच रमेश यांना उपचारार्थ रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवून एनॉन याला अटक केली.

# अल्पवयीन वाहन चोर जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

गुन्हे शाखा युनिट ५ च्या पथकाने गस्तीदरम्यान मोटारसायकलने संशयितरित्या जात असलेल्या अल्पवयीनला ताब्यात घेतले. चौकशीत ती मोटारसायकल चोरीची असल्याचा खुलासा झाला.

शनिवारी रात्री १० वाजताच्या सुमारास युनिट ५ चे पथक मानकापूर ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान अल्पवयीन आरोपी एमपी-२२/एमएच-७३२२ क्रमांकाच्या मोटारसायकलने संशयास्पदरित्या जाताना दिसला. पोलिसांनी त्याला थांबवून वाहनाची कागदपत्रे मागितली असता तो उडवा-उडवीची उत्तरे देऊ लागला. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने ती मोटारसायकल कन्हान येथून चोरी केल्याची माहिती दिली. मानकापूर ठाण्यात आणून अभिलेख तपासला असता कन्हान पोलिस ठाण्यात वरील क्रमांकाचे वाहन चोरीचा गुन्हा दाखल होता. पोलिसांनी मोटारसायकल जप्त करून अल्पवयीन आरोपीला पुढील कार्यवाहीसाठी कन्हान पोलिसांच्या स्वाधिन केले.

# सारथी मार्फत १ हजार ५०० मराठा व कुणबी तरुणांना वाहन चालक प्रशिक्षण

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २९ :

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या वतीने (सारथी) सरदार सूयार्जी काकडे सारथी वाहन चालक कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी समाजातील १ हजार ५०० तरुणांना वाहन चालक प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

प्रशिक्षित वाहन चालकांची देशात व देशाबाहेर दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात मागणी होत आहे. त्यानुसार संस्थेने १५०० व्यक्तींना दर वर्षी हलकी मोटार वाहने (लाईट मोटर व्हेईकल) व जड मालवाहू वाहने (हेवी ट्रान्सपोर्ट व्हेईकल) चालविण्याचे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या तरुण-तरुणींना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या रस्ता सुरक्षा उपक्रमांतर्गत असलेल्या आय.डी.टी.आर. पुणे या केंद्र शासनाच्या संस्थेमार्फत एका महिन्याचे प्रशिक्षण विनामूल्य देण्यात येईल.

दररोज आठ तासाचे हे प्रशिक्षण राहील. त्यामध्ये वाहनांचे भाग, त्यांची देखभाल, दुरुस्ती तसेच वाहन चालनाच्या भारतातील व परदेशातील नियमांची माहिती देण्यात येईल. तसेच दररोज क्षेत्रीय स्तरावर सराव व प्रशिक्षण देण्यात येईल. या विद्यार्थ्यांना एका प्रशिक्षण महिन्यासाठी रुपये १० हजार रुपये विद्यावेतन देण्यात येईल.

सारथीचे अध्यक्ष आणि निवृत्त मुख्य सचिव अजित निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संचालक मंडळाने १७ डिसेंबर २०२४ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत या योजनेला मान्यता दिली असून हे प्रशिक्षण छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या दिवशी १९ फेब्रुवारी २०२५ पासून सुरू करण्याचे निर्देश दिले आहे.यामुळे राज्यातील ग्रामीण भागात तसेच परदेशात तरुणांना रोजगाराची संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होणार आहे. याकरिता जास्तीत जास्त सारथी लक्षीत गटातील व्यक्तींनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांनी केले आहे.

# पुण्यात शिक्षिकेचा दहावीतील विद्यार्थ्यावर लैंगिक अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २९ :

शाळेतील अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार किंवा विनयभंगाचे प्रकार घडताना आपणास सातत्याने पाहावयास मिळतात. मात्र, पुण्यातील खडक पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका इंग्लिश मीडियम शाळेतील २७ वर्षीय शिक्षिकेने दहावीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्याच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

याप्रकरणी पीडित विद्यार्थ्याच्या पालकांनी शिक्षिकेविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केल्यानंतर आरोपी शिक्षिकेस अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी महिला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षिका आहे. काही महिन्यांपूर्वी तिने दहावीतील १७ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थ्याला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यानंतर तिने विद्यार्थ्यासोबत शाळेतच लैंगिक संबंध प्रस्थापित केले. मुलाने झालेला प्रकार आपल्या पालकांना सांगितल्यानंतर त्यांनी पोलिसांत तक्रार दिली. त्यानंतर शिक्षिकेस अटक करण्यात आली.

अल्पवयीन मुलीचे एकतर्फी प्रेमातून अपहरण करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. पोलिसांनी मुलीची नवी मुंबईतील खालापूर परिसरातून सुखरूप सुटका केली. पोलिस आरोपीचा शोध घेत आहेत. याप्रकरणी यश कातुर्डे याच्यासह साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मुलीच्या आईने सहकारनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. गुरुवारी मुलगी आणि तिची आई धनकवडी भागातून निघाली होती.

# राज्यात पीएसआय पदाच्या तीन हजार जागा रिक्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून (एमपीएससी) महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षा (राज्यसेवा) मुख्य परीक्षेचा वर्णनात्मक (लेखी) पॅटर्न २०२५ पासूनच लागू केला जाणार आहे. यंदा होणारी वस्तूनिष्ठ स्वरुपात होणारी ही शेवटची परीक्षा असणार आहे.

त्यामुळे राज्य शासनाच्या विविध विभागातील रिक्त पदांचा समावेश याच परीक्षेच्या जाहिरातील समावेश करावा, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून केली आहे. तर काही विद्यार्थ्यांनी या मागणीला विरोध केला आहे. आता जागांमध्ये वाढ झाल्यास २०२५ मध्ये येणाऱ्या जाहिरातीमध्ये जागा कमी होतील. त्यामुळे शासनाने असा निर्णय घेतल्यास पुढील विद्यार्थ्यांवर अन्याय होईल.

त्यामुळे जागा वाढ करू नये असाही सूर आहे. त्यात अराजपत्रित गट-ब परीक्षामध्येही जागा वाढ करावी अशी मागणी समोर आली आहे. यात पोलीस उपनिरीक्षक पदासंदर्भात एक माहिती अधिकार समोर आला असून यानुसार तीन हजारांच्या जवळपास जागा रिक्त आहेत.

राज्यात पोलिस विभागात मोठ्या प्रमाणात रिक्त पदांचा भरणा आहे. त्यात पोलिस उपनिरीक्षक पदांच्या जागा २ हजार ९५१ असताना राज्य लोकसेवा आयोगाच्या सरळसेवा पोलिस उपनिरीक्षक भरतीत केवळ २१६ पोलिस उपनिरीक्षकांचा समावेश केला आहे.

या प्रकाराने उमेदवारांमध्ये रोष निर्माण झाला आहे. राज्य लोकसेवा आयोगाकडून दोन महिन्यांपूर्वी गट-ब सेवा संयुक्त पूर्व परीक्षेसाठी ४८० जागांसाठी तर गट क मध्ये एक हजार ३३३ पदांसाठी जाहीरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यात गट ब मध्ये २१६ पोलिस उपनिरीक्षकांच्या सरळसेवा भरतीचा समावेश होता.

याशिवाय विक्रीकर निरीक्षक २०८, सहाय्यक विभाग अधिकारी (एएसओ) च्या ५५ जागांचा समावेश होता. याशिवाय गट कच्या लिपिक ८०३ टंकलेखक, ४८२ कर सहायक, नऊ तांत्रिक सहाय्यक जाणि ३९ उद्योग निरीक्षकांच्या जागांचा समावेश होता. या सर्व जागांमध्ये गट बमध्ये असलेल्या पोलिस उपनिरीक्षकांच्या रिक्त जागांची संख्या राज्यात मोठी आहे. एखाद्या राज्यात कायदा सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर इतक्या जागा रिक्त असताना, त्यातून केवळ २९६ जागांसाठी सरळसेवेच्या माध्यमातून भरण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये रोष निर्माण झाला आहे.

# बीड पोलिसांची अंजली दमानियांना नोटीस

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई , दि. २९ :

सामाजिक कार्यकर्त्या आणि आपच्या नेत्या अंजली दमानिया यांना बीड पोलिसांनी नोटीस पाठवली आहे. अंजली दमानिया यांनी संतोष देशमुख खून प्रकरणात मोठा दावा केला होता. संतोष देशमुख यांच्या फरार आरोपींचा खून झाला आहे, असा दावा त्यांनी केला होता. या दाव्यामुळे बीड पोलिसांनी त्यांना नोटीस पाठवली आहे. फरार आरोपींच्या संदर्भात जो दावा केला, त्याचे स्पष्टीकरण द्यावे, अशा सूचना पोलिसांनी पाठवलेल्या नोटीसमध्ये करण्यात आल्या आहेत.



मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडानंतर विरोधकांकडून सरकारवर चहूबाजुंनी हल्लाबोल सुरू आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ शनिवारी बीडमध्ये सर्वपक्षीय मोर्चा देखील काढण्यात आला होता. अशातच अंजली दमानिया यांनी एका कॉलचा हवाला देत संतोष देशमुख हत्याकांडातील फरार आरोपींचा खून झाला, असा दावा केला होता. या दाव्याचे स्पष्टीकरण देण्यासाठी बीड पोलिसांनी अंजली दमानिया यांना नोटीस पाठवली.

अंजली दमानिया यांनी फरार आरोपींच्या संदर्भात जो मृत्यूचा दावा केलाय, त्याचे स्पष्टीकरण देण्याच्या सूचना नोटीसद्वारे करण्यात आल्या आहेत. बीड पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उस्मान शेख यांनी अंजली दमानिया यांना नोटीस बजावली आहे. ज्या मोबाईल नंबरवरून व्हॉइस मेसेज आलेत, तो मोबाईल नंबर, व्हॉइस मेसेज, इतर माहिती आणि पुरावे द्यावे, असे नोटीसीमध्ये नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, पोलिसांनी पाठवलेल्या या नोटीसीवर अंजली दमानिया यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. एसपींनी मी दिलेली माहिती स्थानिक गुन्हे शाखेकडे दिली नसेल. म्हणून त्यांचे मला एक पत्र आले, असा अंदाज अंजली दमानिया यांनी व्यक्त केला. माझ्याकडे आलेली माहिती मी त्या मिनिटालाच एसपींकडे पाठवली होती. त्याचे व्हॉइस मेसेज देखील मी पाठवले होते, सगळे डिटेल्स त्यांना दिले आहेत.

डिलीट झालेल्या पहिल्या दोन मेसेजची देखील माहिती मी पोलिसांना दिली. हे पत्र बघून मला आश्चर्य वाटले, असेही त्या म्हणाल्या. पण स्थानिक गुन्हे शाखेला ही माहिती हवी असेल, तर त्यांना मी माहिती देणार असल्याचे अंजली दमानिया यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना म्हटले आहे.

# पर्यावरणवाद्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात केले चिपको आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

महापालिका आयुक्त आणि उद्यान विभागाने शहरातील बेसुमार वृक्षतोडीला परवानगी दिल्याच्या निषेधार्थ अनेक संघटनांनी रविवार, २९ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात चिपको आंदोलन केले. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील ४७ मोठी झाडे तोडण्यात येत असून त्यातील ४१ झाडे हेरिटेज आहेत.

शहरातील मानकापूर स्टेडियमचे विस्तारीकरण आणि जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम २७२ कोटी रुपये खर्चून करण्यात येत असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत नाशिक एजन्सीला कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. बहुमजली इमारत तयार करण्यासाठी



कॅम्पसमधील सुमारे ४७ झाडे तोडण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. मानकापूर स्टेडियमच्या विस्तारासाठी २८३ झाडे तोडण्याचे प्रस्तावित आहे. दोन्ही ठिकाणी पर्यायी व्यवस्था करण्याऐवजी झाडे तोडण्यास परवानगी दिली जात आहे. शहरातील सक्करदरा येथील आयुर्वेदिक रुग्णालयाच्या विस्तारीकरणासाठी २८३ झाडे तोडण्याचेही प्रस्तावित आहे. जनसुनावणीच्या नावाखाली मनपाकडून फसवणूक केली जात असल्याचा आरोप करत संघटनांनी चिपको आंदोलन केले. आंदोलनात पर्यावरणाशी संबंधित स्वच्छ संस्थेच्या अनुसया काळे, प्रवरा फाऊंडेशनच्या प्राची माहूरकर, पर्यावरण धोरण मूल्याचे कपिल साठे, सचिन वाघमारे सहभागी झाले होते.

## १४ स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकीट विक्री बंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

नववर्ष साजरा करण्यासाठी लोक बाहेर पडतात आणि सर्वत्र गर्दी होते. वर्षाच्या अखेरीस होणारी गर्दी टाळण्यासाठी मध्य रेल्वेने निवडक प्रमुख स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी घातली आहे. प्लॅटफॉर्मवर होणाऱ्या गर्दीचे व्यवस्थापन आणि स्थानक परिसरात प्रवाशांच्या गर्दीचे नियोजन करणे हे या निर्बंधांचे उद्दिष्ट आहे. प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीचे निर्बंध २९ डिसेंबर २०२४ ते २ जानेवारी २०२५ च्या मध्यरात्री १२.०० वाजेपर्यंत लागू असतील. प्लॅटफॉर्म तिकीट विक्री १४ स्थानकांवर बंद राहणार आहे.

## नोकरीच्या आमिषाने निवृत्त लष्करी जवानाची फसवणूक

■ महासागर प्रतिनिधी
पुणे , दि. २९ :

रेल्वेत तिकीट तपासनीस पदावर नोकरी लावण्याच्या आमिषाने एका निवृत्त लष्करी जवानाची १७ लाख २७ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी एका महिलेसह साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी संजीवनी पाटणे (वय २७, रा. केदारी पेट्रोल पंपाजवळ, वानवडी), शुभम मोड (रा. येवलेवाडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका निवृत्त जवानाने फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी संजीवनी पाटणे हिने निवृत्त जवानाला रेल्वेत तिकिट तपासनीस असल्याची बतावणी केली होती. फिर्यादी यांची भाची आणि पुतणीला रेल्वेत नोकरी लावते, असे सांगून त्यांच्याकडून पैसे घेतले. फिर्यादी यांच्या भाचीला रेल्वेतील नियुक्तीचे बनावट पत्र दिले, तसेच पुतणीला नोकरीस लावल्याबाबत पैसे भरल्याची बँकेची बनावट कागदपत्रे मोबाइलवर पाठविली. रेल्वेतील नोकरी आणि औषधोपचारासाठी १७ लाख २७ हजार रुपये घेतले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली.

# छतावरील सौर ऊर्जा निर्मिती

## राज्याला केंद्र सरकारकडून २६0 कोटी रुपये

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर , दि. २९ :

घरांच्या छतावर सौर ऊर्जानिर्मिती पॅनेल्स बसवून वीजनिर्मिती करण्याच्या योजनेत उत्तम कामगिरीबद्दल महाराष्ट्र राज्याला गेल्या चार वर्षात केंद्र सरकारकडून २६० कोटी ९१ लाख रुपये प्रोत्साहनपर रक्कम मिळाली आहे, असे महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले.

छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविणाऱ्या ग्राहकांना केंद्र सरकारकडून अनुदान मिळते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे. या योजनेत वीज ग्राहकांना थेट लाभ होत असल्याने योजनेची प्राधान्याने अंमलबजावणी करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणला केली आहे. छतावरील सौर ऊर्जानिर्मितीच्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी महावितरणला जबाबदारी देण्यात आली आहे.

छतावरील सौर ऊर्जा निर्मितीच्या बाबतीत किती घरांवर प्रकल्प बसविले व त्यातून त्यांची वीजनिर्मिती क्षमता किती झाली याबाबतीत केंद्र सरकारकडून प्रत्येक राज्याच्या कामगिरीचे मूल्यमापन केले जाते. आधीच्या वर्षापेक्षा चालू वर्षात किती जास्त कामगिरी झाली यानुसार केंद्र सरकार त्या त्या वीज वितरण कंपनीला यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रोत्साहनपर रक्कम मंजूर करते.

महाराष्ट्र राज्याला छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्यातील कामगिरीबद्दल केंद्र सरकारकडून २०१९ - २० व २०२० -२१ या दोन आर्थिक वर्षात अनुक्रमे ५९ व ३७ कोटी रुपये प्रोत्साहनपर रक्कम देण्यात आली. २०२१ -२२ या आर्थिक वर्षात राज्याची कामगिरी उंचावल्यामुळे केंद्र सरकारकडून ६९ कोटी ४७ लाख रुपये प्रोत्साहनपर रक्कम मंजूर झाली. २०२२ - २३ या आर्थिक वर्षासाठी ९४ कोटी ९१ लाख रुपये मंजूर झाले. २०२३ - २४ या आर्थिक वर्षात आधीच्या वर्षापेक्षा अधिक चांगली कामगिरी झाल्यामुळे केंद्र सरकारच्या निकषानुसार १३७ कोटी रुपये प्रोत्साहनपर रक्कम मिळणे अपेक्षित आहे.

राज्यामध्ये आतापर्यंत २,३७,६५६ वीज ग्राहकांनी छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविले असून त्यांची एकूण क्षमता २७३८ मेगावॅट आहे. यामध्ये प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या ८१,९३८ ग्राहकांचा व त्यांच्या एकूण ३२३ मेगावॅट क्षमतेचा समावेश आहे. या ग्राहकांना ६४७ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घरावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविणाऱ्या घरगुती ग्राहकांना केंद्र सरकारकडून थेट अनुदान मिळते. एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅट क्षमतेसाठी ६० हजार रुपये आणि तीन किलोवॅट क्षमतेसाठी ७८ हजार रुपये अनुदान मिळते. महावितरणने या योजनेत घरगुती वीज वापरासाठी सौर ऊर्जा निर्मिती पॅनेल्स बसविणाऱ्या ग्राहकांना मोफत नेट मिटर देण्याचा निर्णय घेतला आहे.

# सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कामांना गती देताना त्यामध्ये गुणवत्ता राखा : मुख्यमंत्री फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २९ :

महाराष्ट्राला कृषी, वीज निर्मिती, उद्योग आणि सेवा क्षेत्रात आणखी पुढे घेऊन जाण्यासाठी सौर ऊर्जेवर भर देण्यात येत आहे. त्यामुळे राज्यातील सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कामांना गती देतानाच त्यामध्ये गुणवत्ता राखण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या सूत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथिगृह येथे पार पडली.



मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्राला ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्ण बनवायचे आहे. त्यासाठी विजेशी संबंधित सर्व कंपन्या सुस्थितीत आणाव्या लागतील. भविष्यात त्यात जनतेचा सहभाग वाढविण्यासाठी त्यांचे लिस्टिंग करण्याबाबत विचार करावा लागेल. ऊर्जा विभागांतर्गत कार्यरत कंपन्यांबाबत येणाऱ्या तक्रारी कालमर्यादेत सोडविण्यासाठी जिल्हा, विभाग स्तरावरील यंत्रणा सक्षम करण्यात यावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

बैठकीस ऊर्जा राज्यमंत्री तथा मंडळाच्या उपाध्यक्ष मेघना बोर्डीकर, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक आभा शुक्ला, संचालक लोकेश चंद्रा, राधाकृष्णन बी., अनुदीप दिघे, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, नीता केळकर आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.